# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# विद्यावार्ता

एप्रिल २०२६

ई - मासिक








## समता सप्ताह समारोह

### कर्मयोगी संत गाडगे बाबांचे १५० वे जयंती वर्ष

विशेषांक

# विद्यावार्ता
ई - मासिक


# अनुक्रमणिका


- विद्यापीठात समता सप्ताह निमित्त विविध कार्यक्रम संपन्न १
- विद्यापीठात संशोधन मार्गदर्शक अभिमुखता कार्यशाळेत गुणवत्तेवर भर १६
- पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागातील विद्यार्थीनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत १७
- विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न १८
- मॉडेल डिग्री कॉलेज विद्यार्थ्यांची उतुंग भरारी १९
- विद्यापीठाला अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत प्रथम पारितोषिक २०
- विद्यापीठात स्टार्टअप्सना सीड फंडचे वितरण २१
- विद्यापीठाच्या एम.बी.ए. विभागातील ३३ विद्यार्थांची निवड २३
- १ मे २०२६ वर्धापन दिन विशेष लेख – डॉ. विलास नांदुरकर, जनसंपर्क अधिकारी २४
- जयंती विशेष २८
- बातमी कात्रणे २९





**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**मार्गदर्शक**

**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र- कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रकाशक**

**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**संपादक**

**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

https://www.sgbau.ac.in




# शिक्षणानेच होते आत्मसन्मानाची प्राप्ती - पोलीस अधीक्षक विशाल आनंद .. विद्यापीठात समता सप्ताहाचे उद्‌घाटन



अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

शिक्षण हे मुक्तीचे पहिले पाऊल आहे. केवळ पदवी मिळवणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर आपल्या आत्म्याला आणि विचारांना स्वतंत्र करणे म्हणजे खरे शिक्षण असून शिक्षणानेच आत्मसन्मानाची प्राप्ती होत असल्याचे प्रतिपादन अमरावतीचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने दि. ८ ते १४ एप्रिल या कालावधीत समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी उद्‌घाटनीय भाषण करतांना ते बोलत होते.व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.आर.डी. सिकची, प्रमुख वक्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूरचे माजी कुलसचिव डॉ. पुरण मेश्राम, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.के.बी. नायक, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड



उद्‌घाटनीय भाषण करतांना पो.अ. श्री. विशाल आनंद

आदी उपस्थित होते.

समता सप्ताहाचे उद्घाटन झाल्याची घोषणा करुन पोलीस अधीक्षक पुढे म्हणाले, महाराष्ट्र ही छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि गाडगे बाबा यांसारख्या महापुरुषांची कर्मभूमी आहे. या महापुरुषांनी स्वतःचा विचार न करता समाजासाठी आपले आयुष्य वेचले, जो आपल्या सर्वांसाठी एक मोठा आदर्श आहे. मला महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सार्थ अभिमान आहे. विद्यापीठातर्फे आयोजित केलेला हा उपक्रम स्तुत्य



व्याख्यान देतांना माजी कुलसचिव डॉ. पुरण मेश्राम

असून, यातून नवीन पिढीला नक्कीच प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त करुन समता सप्ताहाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्यात.

**बाबासाहेबांचे राष्ट्र उभारणीतील योगदान ऐतिहासिक – माजी कुलसचिव डॉ. पूरण मेश्राम**

प्रमुख वक्ते माजी कुलसचिव डॉ. पूरण मेश्राम यांनी 'बाबासाहेबांचे राष्ट्र उभारणीत योगदान' या विषयावर विचार मांडले. डॉ. मेश्राम म्हणाले की, बाबासाहेबांची ओळख केवळ दलित नेते किंवा मागासवर्गीयांचे कैवारी एवढ्यापुरती मर्यादित नसून, त्यांनी या देशाचा पाया रचण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी राष्ट्रउभारणीसाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. बाबासाहेबांनी १९२५ मध्ये लिहिलेल्या 'द प्रॉब्लेम ऑफ द रुपी' या ग्रंथातील विश्लेषणाच्या आधारावर १९३४ चा कायदा बनला आणि १ एप्रिल १९३५ रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली.


मार्गदर्शन करतांना व्य.प. सदस्य डॉ. आर.डी. सिकची

ते पुढे म्हणाले, गुलामाची गुलामी दूर करण्यासाठी त्याला शिक्षणाची जाणीव करून दिली पाहिजे, या विचारातून त्यांनी शिक्षण प्रसारावर भर दिला. सायमन कमिशनकडे त्यांनी शाळांच्या इमारती बांधण्यापेक्षा शाळा सुरू करण्याची मागणी केली होती. 'वुई द पीपल ऑफ इंडिया' ही भावना आणि ५० टक्के महिलांना दिलेले अधिकार हे राष्ट्र उभारणीचे मुख्य आधारस्तंभ आहेत. त्यांनी सर्व जाती–धर्माच्या लोकांना एका सूत्रात बांधून भारताला जगात तिसरी शक्ती म्हणून उभे केले. चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि काळाराम मंदिर सत्याग्रह हे केवळ पाण्यासाठी किंवा प्रवेशासाठी नव्हता, तर मानवी हक्क आणि राष्ट्र उभारणीसाठी माणसांना उभे करण्यासाठी होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रउभारणीतील महत्त्वपूर्ण भूमिकेवर यावेळी त्यांनी प्रकाश टाकला. बाबासाहेबांच्या चळवळीचा केंद्रबिंदू कधीही जात किंवा धर्म नव्हता, तर माणूस आणि राष्ट्र हाच होता, असेही ते म्हणाले.

प्रमुख अतिथी डॉ.आर.डी. सिकची यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची महती सांगितली. त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांच्या आयुष्यात बाबासाहेबांच्या विचारांनी कसा सकारात्मक बदल घडवला, याचे एक प्रेरणादायी उदाहरण मांडले. याप्रसंगी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षाची आणि १८–१८ तास केलेल्या अभ्यासाची माहिती दिली. बाबासाहेबांचे नाव आणि त्यांचे विचार हे कोणत्याही संकटावर मात करण्याची शक्ती देतात, असेही ते म्हणाले.

### समतेची मूल्ये आचरणात आणणे हीच बाबासाहेबांना खरी आदरांजली – कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये केवळ भाषणापुरती मर्यादित न ठेवता ती आपल्या दैनंदिन वागणुकीत आणि विचारात उतरवणे हीच त्यांना वाहिलेली खरी आदरांजली ठरेल. बाबासाहेबांनी आपला लढा कधीही विशिष्ट जातीपुरता किंवा धर्मापुरता मर्यादित ठेवला नाही. त्यांनी संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी आणि माणुसकीसाठी संघर्ष केला, ही बाब प्रत्येकाने जाणीवपूर्वक लक्षात घेतली पाहिजे. संविधानातील कलम ३२ हे संविधानाचा आत्मा आहे. या कलमाद्वारे बाबासाहेबांनी सामान्य माणसाला त्याच्या मूलभूत हक्कांच्या रक्षणासाठी थेट सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार दिला, जो जगातील फार कमी देशांमध्ये आढळतो. बाबासाहेबांनी कामगारांसाठी आठ तासांच्या कामाचा नियम आणि महिलांना मालमत्तेत समान अधिकार मिळावा, यासाठी मांडलेला विचार हा राष्ट्र उभारणीचा महत्त्वाचा टप्पा होता. समाजातील शेवटच्या माणसाला न्याय कसा मिळेल, याची पूर्ण काळजी त्यांनी संविधानात घेतली आहे.

ते पुढे म्हणाले, जयंती किंवा समता सप्ताह साजरा केल्यानंतर आपण बाबासाहेबांचे विचार किती प्रमाणात आत्मसात केले, याचा विचार होणे गरजेचे आहे. केवळ उत्सवापुरते मर्यादित न राहता त्यांच्या मूल्यांची उजळणी करून ती आचरणात आणली पाहिजेत. समतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचवणे हाच या सप्ताहाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगून त्यांनी समता सप्ताहाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्यात.

विद्यापीठ गीताने सुरू झालेल्या कार्यक्रमात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख, संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, मेणबत्ती प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शाल, पुस्तक व स्मृतिचिन्ह देवून मान्यवरांच्या स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. संतोष बनसोड यांनी, संचालन प्रा. सुजाता तायडे, तर आभार ॲड. अरुण रौराळे यांनी मानले. याप्रसंगी केमिकल टेक्नॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. अनिल नाईक, बायोटेक्नॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. अनिता पाटील, कार्यक्रमाचे समन्वयक विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, उपकुलसचिव आस्थापना श्री मंगेश वरखेडे, श्री राहुल नरवाडे, सौ. मोनाली तोटे पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, विद्यापीठाच्या आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. विशाल बापते, भौतिकशास्त्र विभागातील डॉ. गजानन मुळे तसेच शिक्षक, कर्मचारी, अमरावती शहरातील गणमान्य नागरिक, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समता सप्ताहनिमित्ताने विद्यापीठ परिसरातीलच ज्ञानस्त्रोत केंद्र (ग्रंथालय) येथे १८ तास अभ्यासाला सुरुवात होवून त्यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी या उपक्रमामध्ये सहभागी झाले होते.



महापुरूषांचे प्रतिमापूजन व मेणबत्ती प्रज्वलन करतांना मान्यवर



पो.अ. विशाल आनंद यांचे स्वागत करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर

# समता सप्ताह निमित्त आयोजित 'समता दौड' ला उत्स्फूर्त प्रतिसाद
## महापुरुषांच्या विचारांची प्रेरणा विद्यार्थ्यांनी घ्यावी - प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे



हिरवी झेंडी दाखवून समतादौडला सुरुवात

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने समता सप्ताहनिमित्ताने आयोजित समता दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यापीठाचे अधिकारी, प्राचार्य, शिक्षक, कर्मचा–यांसह विद्यार्थी–विद्यार्थीनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.

सर्वप्रथम डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पुतळ्याला प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी पुष्पार्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख पुतळा, पंचवटी चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दरम्यान ही 'समता दौड' काढण्यात आली. समता दौडचे हिरवी झेंडी दाखवून प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एच.आर. देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, डॉ. तनुजा राऊत, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत, प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. व्ही.जी. ठाकरे, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, डॉ. पंजाबराव देशमुख नियमन केंद्र समन्वयक डॉ. महेंद्र मेटे, डॉ. गजानन मुळे, आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड, डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे तसेच विविध प्राधिकारिणींचे आजी व माजी सदस्य यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.



डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांना अभिवादन



इर्विन चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

पंचवटी चौक येथून निघालेल्या समता दौडने श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे व त्यानंतर कला व वाणिज्य महाविद्यालय येथे सुध्दा महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. इर्विन चौक येथे या समता दौडचे समापन झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला सर्व मान्यवरांनी अभिवादन केले. यावेळी मार्गदर्शन करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि शिक्षण महर्षि डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी देशाच्या उभारणीमध्ये फार मोठे योगदान दिले असून त्यांच्या विचाराची सर्वांनी प्रेरणा घ्यावी आणि मार्गक्रमण करावे. संत गाडगे बाबांचे विचार विविध उपक्रमाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य आपले विद्यापीठ नेहमी करीत राहिले आहे व समता सप्ताह निमित्ताने होणा–या सर्व कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले. यावेळी विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




इर्विन चौक येथे अभिवादनानंतर मार्गदर्शन करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

## समता सप्ताहनिमित्त निघालेल्या रॅलीची क्षणचित्रे







# समता सप्ताहनिमित्त निघालेल्या रॅलीची क्षणचित्रे







# डॉ. भाऊसाहेब देशमुख यांच्या विचार व कार्यातच सामाजिक समता ठासून भरली होती - डॉ. स्वप्निल अरसड .. विद्यापीठात समता सप्ताहनिमित्त व्याख्यान संपन्न





विषयावर व्याख्ययान देतांना डॉ. अरसड

डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या विचार व कार्यातच सामाजिक समता ठासून भरली होती आणि त्यासाठी ते आयुष्यभर कार्य करीत राहिले, असे प्रतिपादन श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचे भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. स्वप्निल अरसड यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने समता सप्ताह समारोह–२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने १० एप्रिल रोजी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचा सामाजिक समतेचा विचार व कार्य' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रा. प्रफुल्ल कडू, डॉ. पंजाबराव देशमुख अर्थनियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते.




अध्यक्षीय भाषण करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे



डॉ. अरसड पुढे म्हणाले, जगभरातील शेतक–यांना जागृत करण्यासाठी डॉ. भाऊसाहेबांनी शेतकरी संघाची स्थापना केली. त्या माध्यमातून त्यांनी शेतक–यांना एकत्रित केले. शेतक–यांसाठी नाबार्ड बँकेची स्थापना करण्यासाठी डॉ. भाऊसाहेबांनीच प्रयत्न केले व ते यशस्वी सुध्दा झाले. गोरगरीबांच्या मुलांचे शिक्षण व्हावे, त्यांच्या राहण्याची व्यवस्था व्हावी, म्हणून डॉ. भाऊसाहेबांनी श्रध्दानंद वसतीगृह सुरू केले. एवढेच नाही, तर मुलांच्या जेवणाची व्यवस्था सुध्दा त्यांनी केली. शिक्षणानेच माणूस समृध्द होतो, याची जाणीव असलेल्या भाऊसाहेबांनी श्री शिवाजी शिक्षण संस्था उभारुन गोरगरीबांच्या मुलांसाठी शिक्षणाची दारे उघडून दिलीत. अंबादेवी मंदीर सत्याग्रह, सहभोजन, अस्पृश्यांसाठी पाणवठे, विहिरी खुल्या केल्यात, त्यासाठी आंदोलन केले. मध्य प्रांताचे मंत्री असतांना डॉ. भाऊसाहेबांनी कर्ज लवाद कायदा, देवस्थान अधिग्रहण संपत्ती कायदा केला. कृषी संशोधन संस्था, कृषी विद्यापीठे डॉ. भाऊसाहेबांनी सुरू केलीत. एवढेच नाही, तर विद्यापीठ लोकांकडे जावे, म्हणून त्यांनी शिवाजी लोकविद्यापीठ सुरू केले. जागतिक कृषी प्रदर्शन आयोजित करुन जगभरातील शेतक–यांना एकत्र आणले. यातूनच सामाजिक समता डॉ. भाऊसाहेबांच्या विचार व कार्यात किती ठासून भरली होती, हे स्पष्टहोते, असेही डॉ. अरसड म्हणाले.

याप्रसंगी प्रमुख अतिथी प्रा. प्रफुल्ल कडू, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, इतरांना सांगण्याआधी डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी स्वत: आंतरजातीय विवाह करुन समतेचा संदेश आणि आदर्श देशाला दिला. समतेचे त्यांनी स्वत:च आचरण करुन तशी शिकवण दिली. महामानवांनी समाजासाठी केलेले कार्य अपूर्व असून त्यांच्या विचार व कार्याची सर्वांनी प्रेरणा घ्यावी, तेव्हाच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असेही प्र–कुलगुरू डॉ. ढोरे म्हणाले.

डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व मेणबत्ती प्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. याप्रसंगी डॉ. स्वप्निल अरसड यांच्या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. शाल, श्रीफळ व पुस्तक देवून पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकातून डॉ. महेंद्र मेटे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली व पाहुण्यांचा परिचर करुन दिला. सूत्रसंचालन डॉ. संतोष बनसोड यांनी, तर आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, आजीवन अध्ययन चे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, रा.से.यो. संचालक डॉ. निलेश कडू, सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख डॉ. नितीन फिरके, बायोटेक विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील, डॉ. प्रेमानंद तिडके तसेच विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, अमरावती शहरातील गणमान्य नागरिक, महिला, पुरुष, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

# महापुरुषांनी मांडलेली समतेची संकल्पना मानवी मूल्य आणि सामाजिक न्यायाचा पाया - डॉ. ओमराज गजभिये .. विद्यापीठात समता सप्ताहनिमित्त व्याख्यान संपन्न




व्य.प.सदस्य डॉ. मनिषा कोडापे विचार मांडतांना

तथागत गौतम बुध्द, महात्मा जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांनी मांडलेली समतेची संकल्पना केवळ राजकीय हक्कांपुरती मर्यादित नसून ती मानवी मूल्ये आणि सामाजिक न्यायाचा पाया आहे, असे मौलिक विचार कमलाताई बनमेरू महिला महाविद्यालय, लोणार येथील डॉ. ओमराज गजभिये यांनी मांडले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने समता सप्ताह समारोह–२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त 'महात्मा फुले यांचा समतावादी दृष्टीकोन' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सदस्य डॉ. मनिषा कोडापे, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते.




व्याख्यान देतांना डॉ. ओमराज गजभिये




अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना डॉ. दादाराव चव्हाण

विषयाची मांडणी करतांना डॉ. गजभिये म्हणाले, आजच्या काळात मानवी मूल्यांना छेद देण्याचे प्रयत्न होत असताना, समाजाने सजग झाले पाहिजे. भिडे वाडङ्मात सुरू झालेली पहिली शाळा ही केवळ शिक्षणाची सुरुवात नव्हती, तर ती हजारो वर्षांच्या गुलामगिरीच्या जोखडातून स्त्रियांना मुक्त करणारी एक मोठी क्रांती होती. महात्मा फुलेंनी केवळ शेतक–यांच्या प्रश्नांवरच नव्हे, तर कार्ल मार्क्स यांच्या विचारांच्या धर्तीवर कामगारांच्या हक्कासाठीही लढा दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून या समतेच्या विचाराला कायदेशीर अधिष्ठान मिळवून दिले. आज आपण आपल्या हक्क आणि कर्तव्यांबद्दल जागृत झालो नाही, तर येणा–या पिढ्यांचे भविष्य अंधकारमय होईल, असेही ते म्हणाले. प्रमुख अतिथी डॉ. मनिषा कोडापे म्हणाल्या, स्त्री शिक्षणाचा पाया फुले दाम्पत्यांनी रचला आणि प्रचंड विरोध पत्करुन स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे उघडी केलीत. आज स्त्रिया सर्वच क्षेत्रांत अग्रेसर आहेत, असे असले तरी व्यापक मानसिक परिवर्तन आणि प्रबोधनाची गरज आहे. केवळ घोषणांनी नव्हे, तर महात्मा फुलेंनी दिलेल्या समतेच्या विचारानुसार समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी मानसिक दृष्किोन बदलणे हेच या व्याख्यानाचे उद्दिष्टआहे.

अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. दादाराव चव्हाण म्हणाले, ज्यांनी महाराष्ट्रच नाही, तर पर्यायाने भारताच्या सामाजिक जडणघडणीचा पाया रचला, त्या महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या बलिदानामुळेच आज आपण सन्मानाने उभे आहोत. महात्मा फुले यांनी शिक्षण नसेल तर काय होईल याची प्रचिती 'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले आणि वित्तविना शूद्र खचले' या रचनेतून आणून दिली. महात्मा फुलेंनी शाळा तर उघडली, पण मुलींना शिकवणार कोण? हा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर होता. तेव्हा जोतिरावांनी आधी सावित्रीबाईंना साक्षर केले आणि सावित्रीबाईंनी मुलींना शिक्षणाचे धडे दिले. सावित्रीबाईंनी जे सोसले, त्याची जाणीव आपण सर्वांनी ठेवायला हवी, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व मेणबत्ती प्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. शाल, श्रीफळ व पुस्तक देवून पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. पंडित भोयर यांना आचार्य पदवी मिळाल्याबद्दल त्यांचा डॉ. ओमराज गजभिये यांनी सत्कार केला. प्रास्ताविकातून डॉ. संतोष बनसोड यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली व पाहुण्यांचा परिचय करुन दिला. सूत्रसंचालन सौ. वर्षा लोणारे यांनी, तर आभार प्रा. कल्पना पाटील यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला डॉ. प्रेमानंद तिडके, उपकुलसचिव श्री राहुल नरवाडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, ॲड. अरुण रौराळे, तसेच विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, अमरावती शहरातील गणमान्य नागरिक, महिला, पुरुष, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली

# 'ज्योतिबाची सावली, सावित्री माऊली' नाटकाला उत्स्फूर्त प्रतिसाद
## विद्यापीठात समता सप्ताहनिमित्त डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचा उपक्रम



नाटकातील एक प्रसंग

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने समता सप्ताह समारोह-२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने १३ एप्रिल रोजी 'ज्योतिबाची सावली, सावित्री माऊली' या दोन अंकी नाटकाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अपूर्वा सोनार व सहकलाकारांनी स्त्री शिक्षणापासून केलेल्या सामाजिक समतेची पार्श्वभूमी या दोन अंकी नाटकातून कलाकारांनी साकारली. याप्रसंगी व्यासपीठावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर, डॉ. संदीप वाघुळे, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. संदीप वाघुळे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांनी बहुजनांसाठी केलेल्या कार्याची माहिती दिली. तर तत्कालिन परिस्थिती विरोधात महात्मा फुले यांना किती लढा द्यावा लागला आणि त्यासाठी त्यांना किती आव्हानांना सामोरे जावे लागले, असे डॉ. नितीन कोळी म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथील चवदार तळ्याच्या पाण्यासाठी सत्याग्रह केला. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करुन बहुजनांच्या मुलांचे विवाह त्या पध्दतीने लागतील, असे स्पष्टकेले.

डॉ. भैय्यासाहेब मेटकर म्हणाले, फुले दाम्पत्यांनी स्त्री शिक्षणासाठी फार मोठा त्याग केला आहे व त्यामुळेच आज आपण शिक्षित झालो. स्त्री ही दोन कुटुंबियांचा उध्दार करणारी आहे. माँ साहेब जिजाऊ, सावित्रीबाई फुले, रमाबाई या आदर्श आहेत, असेही ते म्हणाले. याप्रसंगी ज्योतिबाची सावली, सावित्री माऊली या पुस्तकाच्या दुस-या आवृत्तीचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच कलावंत अपूर्वा सोनार, जयकुमार चर्जन, शिला चर्जन, सचिन करडे, अनुराधा भुस्कटे, वृंदा तडस, मोनिका मेहरे, शितल मडघे यांचा मान्यवरांच्या हस्ते पुस्तक देवून सत्कार करण्यात आला. महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, मेणबत्ती प्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात



मार्गदर्शन करतांना व्य.प.सदस्य डॉ. व्ही.एम. मेटकर

आली. सूत्रसंचालन डॉ. संतोष बनसोड यांनी केले. यावेळी संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. दिलीप काळे, प्रादर्शिक कला विभागाचे समन्वयक डॉ. भोजराज चौधरी, महानुभाव अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. महंत सोनपेठकर, डॉ. अनिल नाईक, डॉ. प्रेमानंद तिडके, सौ. मोनाली तोटे पाटील, सो. मिनल मालधुरे तसेच अमरावती शहरातील गणमान्य नागरिक, महिला, पुरुष, विद्यार्थी उपस्थित होते.



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात 'समता सप्ताह' उत्साहात संपन्न .. विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना १३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने विद्यापीठातील संविधान शिल्प येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत भव्य रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य कटआऊट लावण्यात आले होते. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या प्रमुख उपस्थितीत रॅलीला सुरुवात झाली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या 'समता सप्ताहाचा' आज समारोप झाला. ८ एप्रिलपासून सुरु झालेल्या या सप्ताहात विविध प्रबोधनात्मक आणि शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे समतेचा संदेश देण्यात आला. सर्वप्रथम कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून विद्यापीठाच्यावतीने त्यांना अभिवादन केले. याप्रसंगी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे उपस्थित होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विद्यापीठाच्यावतीने अभिवादन

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी हारार्पण करुन अभिवादन केले. त्या परिसरात लावलेल्या स्टॉलवर विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे व संत गाडगे बाबांनी दिलेला दशसूत्रीतील संदेश पशू, पक्षी, मुक्या प्राण्यांना अभय व तहानलेल्यांना पाणी नुसार मातीचे भांडे तसेच विविध ग्रंथांचे वाटप नागरिकांना करण्यात आले.

विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटनेतर्फे विविध वाचनालयांना स्पर्धा परीक्षा पुस्तके व ग्रंथ भेट

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटनेतर्फे भीम टेकडी येथील बौद्ध धम्म प्रचार समिती संचालित ग्रंथालयाला स्टील आलमारी, बळीगाव येथील श्रावस्ती अभ्यासिकेला रू. १५,५००/– किमतीची पुस्तके व ग्रंथ तसेच तपोवन येथील ज्ञानप्रतिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेला रू. २६,८००/– किमतीची पुस्तके व ग्रंथ भेट देण्यात आले. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाया विद्यार्थ्यांसाठी उपयोगी ठरणार आहे.

याप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते म्हणाले, ८ एप्रिल रोजी या समता सप्ताहाचे उद्घाटन झाले आणि आज १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीदिनी याचा समारोप होत आहे. या आठवडाभरात राबवण्यात आलेल्या उपक्रमांतून समतेचा मंत्र संपूर्ण शहरात, राज्यात आणि विशेषतः विद्यार्थी वर्गात पोहोचवण्याचा प्रयत्न विद्यापीठाने केला आहे. सामाजिक समताच्या निमित्ताने यापुढे विद्यार्थ्यांना वाटचाल करावयाची असून बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार व प्रचार करायचा आहे, त्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन याप्रसंगी करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्यात.

यावेळी विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मागासवर्ग कर्मचारी संघटनेद्वारे याप्रसंगी ग्रंथवाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमात विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रविण रघुवंशी, डॉ. मनिषा कोडापे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, नवोपक्रमचे संचालक डॉ. अजय लाड, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड, विद्यापीठ आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात, डॉ. प्रेमानंद तिडके, डॉ. गजानन मुळे, तसेच डॉ. प्रफुल्ल गवई, डॉ. मनिष गवई, डॉ. रत्नशील खोब्रागडे, विद्यापीठ कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, श्री विक्रांत मालवीय, श्री मंगेश वरखेडे, सौ. मिनल मालधुरे, श्री राहुल नरवाडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख यांचेसह विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच विविध प्राधिकारिणींच्या सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## इर्विन चौक येथील कार्यक्रमाची क्षणचित्रे




















## विद्यार्थ्यांनी देशहित डोळ्यासमोर ठेवून संशोधन करावे - कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते
## विद्यापीठात संशोधन मार्गदर्शक अभिमुखता कार्यशाळेत गुणवत्तेवर भर



मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व व्यासपीठावर उपस्थित मान्यवर

विद्यार्थ्यांनी देशहित डोळ्यासमोर ठेवून संशोधन व गुणवत्ता वाढवावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा गुणवत्ता हमी कक्ष व अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ, अमरावती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संशोधन मार्गदर्शक अभिमुखता : नियमावली, दिशा आणि संशोधन गुणवत्ता कार्यशाळेत अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर उद्घाटक म्हणून अ.भा. शैक्षिक महासंघाच्या विभागीय अध्यक्ष डॉ. मीनल भोंडे, बीजभाषक म्हणून सिम्बायोसिस सेंटर फॉर मेडिकल इमेजिंग, पुणे येथील डॉ. भूषण बोरोटीकर, आय.क्यू.ए.सी. चे संचालक डॉ. संदीप वाघुळे, विद्यापीठ विद्या परिषद सदस्य डॉ. हेमंत चांडक, अ.भा. शैक्षिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. ओमप्रकाश मुंदे उपस्थित होते. डॉ. मीनल भोंडे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.

डॉ. भूषण बोरोटीकर यांनी संशोधनातील गुणवत्ता, प्रामाणिकता, प्लॅजिअरिझम नियंत्रण तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन निकष यावर सखोल मार्गदर्शन केले.

डॉ. मीनल भोंडे यांनी संशोधन संस्कृती अधिक सक्षम करण्यासाठी मार्गदर्शकांची तसेच संशोधकांची जबाबदारी अधोरेखित करत शैक्षिक महासंघ शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता व पारदर्शकता अधिक प्रभावी व्हावी आणि संशोधन व्यावसायभिमुख आणि समाजाभिमुख व्हावे, याकरिता सर्व मार्गदर्शकांनी जातीने लक्ष द्यावे, असे आवाहन केले.

दुपारच्या सत्रात डॉ. हेमंत चांडक यांनी संशोधन पध्दती, संशोधन प्रस्ताव लेखन आणि विश्लेषण, तसेच यूजीसी २०२२ च्या नियमावलीवर आधारित संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे ४१/२०२२५ यावर सविस्तर विवेचन करतांना संशोधक, मार्गदर्शक, समन्वयक आणि प्राचार्य यांचा सहभाग आणि पीएचडी सेलव्दारे कागदपत्रे सादर करतांना संशोधक विद्यार्थ्यांना येणा–या अडचणी आणि त्यावरील उपाययोजना याबाबत त्यांनी उपयुक्त मार्गदर्शन केले. सत्राच्या अध्यक्षस्थानी मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती येथील प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख होत्या. संशोधक आणि मार्गदर्शक नियमावलींचा अभ्यास करून संशोधन आणि कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी यावेळी माहिती दिली. पॅनेल चर्चेदरम्यान संशोधन गुणवत्ता, मार्गदर्शक – विद्यार्थी संबंध, प्रकाशन प्रक्रिया व संशोधनातील नैतिकता यावर चर्चा झाली. समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. मीनल भोंडे, प्रमुख अतिथी म्हणून प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, उपकुलसचिव डॉ. मीनल मालधुरे उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. मंगेश अडगोकार यांनी केले. डॉ. संदीप वाघुळे यांनी आय.क्यू.ए.सी. ची भूमिका विषद केली. सूत्रसंचालन डॉ. वि. रा. मांडवकर यांनी, तर आभार डॉ. ओमप्रकाश मुंदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या सर्व अध्यक्ष, महामंत्री, महिला प्रमुख, सहप्रमुख तसेच अभ्यास मंडळ अध्यक्ष, पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यशाळेला विविध विद्याशाखांमधील संशोधन मार्गदर्शक प्राध्यापक, पीएच.डी. संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



डॉ. भूषण बोरोटीकर मार्गदर्शन करतांना



डॉ. मिनल भोंडे आपले विचार मांडतांना



कार्यशाळेला उपस्थित संशोधन मार्गदर्शक, प्राध्यापकवृंद,संशोधक विद्यार्थी

## पदव्युत्तर प्राणिशास्त्र विभागातील विद्यार्थीनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत



कु. दिया चव्हाण



कु.सिया चव्हाण

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर प्राणिशास्त्र विभागातील कु. सिया विलास चव्हाण व कु. दिया विलास चव्हाण या जुळ्या भगिनींनी अनुक्रमे ८.८६ आणि ८.८० पॉईंट घेऊन विद्यापीठाच्या उन्हाळी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एस. एस्सी. भाग–२ प्राणिशास्त्र परीक्षेत उत्तीर्ण होऊन गुणवत्ता यादीत अनुक्रमे पाचव्या आणि सहाव्या क्रमांकाने येण्याचा मान मिळिवला आहे.

या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हेमलता नांदूरकर तसेच शिक्षक श्री विनोद नागले, डॉ. शितल काळे, डॉ. रजनी तायडे, अंकिता पानसरे, अर्पित इंगळे, संपदा जोशी, रचना धुरे, विनय झटाले यांनी अभिनंदन केले आहे. विद्यार्थिनी आपल्या यशाचे श्रेय आईवडील व शिक्षकवृंदांना देतात.

# शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात अंधश्रध्देला थारा नाही - डॉ. श्रीकांत पाटील
## विद्यापीठातील आजीवन अध्ययन विभागात
## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. श्रीकांत पाटील

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारात पारदर्शकता, न्यायप्रियता आणि सुयोग्य प्रशासन यावर विशेष प्रकाश टाकतांना आजच्या काळात प्रभावी नेतृत्व आणि सुशासन यासाठी शिवाजी महाराजांचे तत्त्वज्ञान अत्यंत मार्गदर्शक ठरते. विद्यार्थी तसेच तरुण पिढीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा सखोल अभ्यास करून प्रत्यक्ष जीवनात उतरवणे ही काळाची गरज आहे. सोबतच सध्या महाराष्ट्रात सुरू असलेल्या भोंदूगिरी सारखा प्रकाराला छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात थारा नव्हता असे, प्रतिपादन डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले. आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त एक अत्यंत भावपूर्ण, प्रेरणादायी आणि शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ परिसरात आयोजित या कार्यक्रमात इतिहास, व्यवस्थापन आणि राष्ट्रनिष्ठा यांचा संगम अनुभवायला मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, एम.ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा आणि व्यवस्थापन अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. भैय्यासाहेब चिखले, प्रमुख वक्ते डॉ. वैभव म्हस्के, पंचवटे सर, सुरेश रहाटे उपस्थित होते.

प्रमुख वक्ते डॉ. वैभव म्हस्के यांनी आपल्या सखोल आणि अभ्यासपूर्ण भाषणातून शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा विविध अंगांनी परामर्श घेतला. त्यांनी महाराजांची युध्दनीती, प्रशासन, गनिमी कावा, सागरी सामर्थ्य, लोककल्याणकारी राज्यकारभार याचा उल्लेख करत त्यांच्या कार्याचे आधुनिक काळातील व्यवस्थापनशास्त्राशी असलेले संबंध स्पष्ट केले. शिवाजी महाराज हे केवळ एक पराक्रमी योध्दे नव्हते, तर ते एक उत्कृष्ट व्यवस्थापक, दूरदर्शी नेतृत्व आणि लोकाभिमुख राजा होते, असे ते म्हणाले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सुध्दा शिवाजी महाराजांवर विचार मांडले, तर काहींनी घोषवाक्यांद्वारे वातावरण अधिक प्रेरणादायी केले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण



करून करण्यात आली. डॉ. भैय्यासाहेब चिखले यांनी प्रास्ताविकेतून शिवाजी महाराजांच्या विचारधारेचा शैक्षणिक अभ्यासक्रमाशी असलेला निकट संबंध अधोरेखित केला. सूत्रसंचालन प्रा. भूषण घोंगडे, आभार अमित शिंदे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाला विभागातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## मॉडेल डिग्री कॉलेजच्या विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी
## भूषण काळेची सीए परीक्षेत बाजी, तर खुशी अग्रवालची पीडब्ल्यूसी मध्ये निवड





बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात यशाचा नवा मानदंड प्रस्थापित केला आहे. महाविद्यालयाचे विद्यार्थी भूषण काळे याने 'द इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया' द्वारे आयोजित चार्टर्ड अकाउंटन्सी (सीए), तर खुशी अग्रवाल हिने इंटरमिजिएट परीक्षेत घवघवीत यश संपादन करून व्यावसायिकतेच्या दिशेने यशस्वी पाऊल टाकले आहे. तिची निवड जागतिक स्तरावरील 'पीडब्ल्यूसी' मध्ये झाली. यामुळे महाविद्यालयाच्या यशात एक मानाचा तुरा खोवला गेला. खुशी अग्रवालची झालेली निवड म्हणजे जगातील प्रतिष्ठित 'बिग फोर' ऑडिट आणि कन्सल्टिंग संस्थांपैकी एक असलेल्या पीडब्ल्यूसी' या मुंबईतील जागतिक व्यावसायिक सेवा फर्ममध्ये झाली आहे. भूषण काळे याने सीए सारखी कठीण परीक्षा उत्तीर्ण करण्यासोबतच खुशी अग्रवालने इतक्या मोठ्या आंतरराष्ट्रीय कंपनीत स्थान मिळवणे या दोन्ही विद्यार्थ्यांच्या कष्टाची आणि महाविद्यालयाच्या मार्गदर्शनाची पावती आहे.

भूषण आणि खुशी यांनी सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. बुलडाणा सारख्या छोट्या शहरांतील विद्यार्थी देखील जिद्द असेल तर यश संपादन करू शकतात हे देखील अधोरेखित झाले आहे. या दोन्ही विद्यार्थ्यांच्या उत्तुंग यशाबद्दल मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ. अण्णासाहेब म्हळसणे यांनी त्यांचे कौतुक व अभिनंदन केले. यावेळी महाविद्यालयातील डॉ. महेश व्यवहारे, प्रा. दिपक नन्हई, प्रा. सुचिता माळोदे, डॉ. दिपक देशमुख, प्रा. अक्षय नरवाडे, प्रा. प्रमोद पंडित, प्रा. बलवान विणकर, डॉ. मुरलीधर जाधव, प्रा. सुनिता गायकी तसेच प्राध्यापकवृंद उपस्थित होते. भूषण आणि खुशी यांच्या या कामगिरीमुळे संपूर्ण परिसरातून आणि शैक्षणिक वतुर्ळातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# अमरावती विद्यापीठाच्या संघाने रचला इतिहास
# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत प्रथम पारितोषिक




ऑल इंडिया युनिर्व्हसिटीज व्दारा आयोजित मौलाना आजाद नॅशनल उर्दू, विद्यापीठ, हैद्राबाद येथे ०१ ते ०२ एप्रिल, २०२६ दरम्यान झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत कला क्षेत्रातील अतिशय प्रतिष्ठीत प्रथम पुरस्कार संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांच्या संघाने दिमागदार कामगिरीने प्राप्त करून इतिहास रचला आहे. या यशाबद्दल चमूंचे सर्वत्र कौतुक होत आहे.

विद्यापीठ चमूंमध्ये ओम कराळे, अजय हागे, गजानन पळसकर, कु. कल्याणी सावके, कु. आचल सरदार, कु. शर्वरी देशमुख, कु. ईश्वरी इंगळे, कु. गौरी लड्ढा, कु.साक्षी वानखडे, कु. गौरी मलथानकर, तर साथीदार म्हणून तबला वादक श्री हितेश व्यास, ढोलकी वादक श्री कार्तिक नंदवंशी व हार्मोनियम वादक श्री अमर कतोरे तसेच संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. अभिजित अणे व डॉ. राधिका देशमुख यांचा समावेश होता.

विद्यार्थी विकास विभागांतर्गत यावर्षी आयोजित आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव, आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य राज्य स्पर्धा, आंतर विद्यापीठ मध्य विभाग स्पर्धा, आंतर विद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सव तसेच आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली या सर्व स्पर्धेमध्ये मिळालेल्या अभूतपूर्व यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी संपूर्ण संघाचे अभिनंदन केले आहे.



# विद्यापीठात स्टार्टअप्सना सीड फंडचे वितरण
# दोन नाविन्यपूर्ण कंपन्यांना मिळाले आर्थिक पाठबळ
# विद्यार्थ्यांनी स्टार्टअप ला करिअर म्हणून प्राधान्य द्यावे - कुलगुरू



मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाउंडेशनद्वारे बुधवार दि. २ एप्रिल रोजी दोन उदयोन्मुख स्टार्टअप्सना 'सीड फंड' चे (बीज भांडवल) इन्क्युबेशन सेंटरमध्ये पार पडलेल्या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण सोसायटीच्या अर्थसहाय्याने या निधीचे वितरण करण्यात आले. डंग्स ॲन्ड हर्ब्स प्रा. लि. ला रु. २ लक्ष व कृष्णामय आयुरयोग प्रा. लि. ला रु. २.५ लक्ष सीड फंडचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, इन्क्युबेशन सेंटर प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना कुलगुरू म्हणाले, स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन देणे आवश्यक असून विद्यार्थ्यांनी स्टार्टअपला करिअर म्हणून अधिक प्राधान्य द्यावे. विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आर्थिक आणि तांत्रिक मदत पुरवली जात आहे. केंद्र आणि राज्य सरकारकडून प्राप्त होणा–या निधीचा वापर करून ज्या विद्यार्थ्यांकडे व्यावसायिक क्षमता असलेल्या नाविन्यपूर्ण कल्पना आहेत, त्यांना प्रोटोटाईप विकसित करण्यासाठी सीड फंड दिला जातो. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मोठी मदत होत आहे. भारतात सध्या स्टार्टअप्सची मोठी क्रांती होत आहे. २०१४ मध्ये देशात केवळ ५०० नोंदणीकृत स्टार्टअप्स होते, ती संख्या आज दोन लाखांच्या पुढे गेली आहे. विशेष म्हणजे यातील ५० टक्के स्टार्टअप्स हे नागपूर, अमरावती, अकोला यांसारख्या शहरांमधून आलेले आहेत. त्याहूनही अभिमानाची बाब म्हणजे, एकूण स्टार्टअप्सपैकी ४८ टक्के व्यवसायांमध्ये किमान एक महिला संस्थापक किंवा संचालिका आहे. महिला सक्षमीकरणाचे हे एक उत्तम उदाहरण असल्याचेही कुलगुरू म्हणाले.

विद्यार्थ्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहून पैसे कमवण्यासोबतच समाजातील प्रश्न सोडवून इतरांनाही रोजगार उपलब्ध करून देण्याचे समाधान स्टार्टअप्सच्या माध्यमातून मिळू शकते, असा विश्वासही कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी यावेळी व्यक्त केला. इन्क्युबेशन सेंटर प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर यांनी सेंटरमधील उपक्रमांबाबत माहिती दिली. सूत्रसंचालन व आभार सेंटरचे व्यवस्थापक श्री अमोल हिरुळकर यांनी मानले. कार्यक्रमाला शासकीय तंत्रनिकेतनमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नरेश मोवळे, रवी ढेंगळे, भावेश वारके यांनी अथक परिश्रम घेतले.





सीड फंडचे वितरण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते




# विद्यापीठात स्टार्टअप्सना सीड फंडचे वितरण

## पाच नाविन्यपूर्ण कंपन्यांना आर्थिक पाठबळ



सीड फंडचे वितरण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाउंडेशन मार्फत पाच उदयोन्मुख स्टार्टअप्सना 'सीड फंड' चे (बीज भांडवल) वितरीत करण्यात आले. हा निधी वितरण सोहळा नुकताच विद्यापीठ परिसरातील इन्क्युबेशन सेंटरमध्ये पार पडला. स्टार्टअप इंडिया सिड फंड स्किम अंतर्गत या स्टार्टअप्सना आर्थिक सहाय्य देण्यात आले. त्यामध्ये श्री मोरया ॲग्रो रिसर्च नॅनो बायोटेक ८ लाख, एसजेडी श्रीजी ब्रादर्स प्रा. लि. ६ लाख, वेनो टेक्नॉलॉजीज प्रा. लि. १० लाख, पवन ई-पॉवर सोल्यूशन्स टेक्नॉलॉजी प्रा. लि. १० लाख आणि इनशीराह हर्बल्स प्रा. लि. ४ लाख असे निधीचे वितरण विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी स्टार्टअप्सच्या नाविन्यपूर्ण संकल्पना जाणून घेतल्या तसेच उद्योजकांना मार्गदर्शनही केले.

भारत सरकारच्या स्टार्टअप इंडिया सिड फंड स्किमच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण कल्पनांना चालना देण्यासाठी हा निधी प्रदान केला जातो. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे इन्क्युबेशन सेंटर विभागातील स्टार्टअप्सना तांत्रिक मार्गदर्शन, पायाभूत सुविधा आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देत सक्षम स्टार्टअप इकोसिस्टम उभारण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सदर स्टार्टअप्सना आर्थिक पाठबळ मिळवून देण्यासाठी विद्यापीठाच्या रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाउंडेशनच्यावतीने अथक परिश्रम घेण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर, संचालक व सीईओ श्री आनंद यादव तसेच मॅनेजर श्री अमोल हिरुळकर, नरेश मोवाळे, रवी ढेंगळे आणि भावेश वारके यांचे मोलाचे सहकार्य लाभले.




# विद्यापीठाच्या एम.बी.ए. विभागातील ३३ विद्यार्थ्यांना मिळाली नोकरी
## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यार्थ्यांना दिल्या शुभेच्छा



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवसाय प्रशासन आणि व्यवस्थापन विभागातील ३३ विद्यार्थ्यांना डी मार्ट, आयडीएफसी फर्स्ट बँक, जिओ फायनान्शियल सर्व्हिसेस, इंडिया मार्ट, टी अँन्ड एम सर्व्हिसेस कन्सल्टन्सी प्रा.लि., थानेदार ग्रुप, कॅक्टो यांसारख्या प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये एचआर एक्झिक्युटिव्ह, सेल्स एक्झिक्युटिव्ह, क्लस्टर असिस्टंट आणि सीआरएम अशा पदांवर नोकरी मिळाली आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या एम.बी.ए. विभागाचे यश सर्वत्र दिसत असून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्यात.

सध्याच्या तणावपूर्ण आणि अनिश्चित परिस्थितीत रोजगाराच्या संधी कमी झाल्या आहेत. अशा कठीण काळात विद्यार्थ्यांसाठी नोकरी मिळवणे मोठे आव्हान बनले आहे. मात्र, या सर्व अडचणींवर मात करत विद्यापीठाच्या एमबीए विभागाने विद्यार्थ्यांचे यशस्वी प्लेसमेंट करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. प्लेसमेंट प्रक्रिया अद्याप सुरू असून येत्या काही आठवड्यात आणखी विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध होण्याची शक्यता एमबीए विभागाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. व्ही. आर. ऑगस्टीन यांनी व्यक्त केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आठवडाभर चालणा–या कार्यक्रमात ॲप्टिट्युडटेस्ट, ट्रेनिंग, ॲडव्हॉन्स एक्सेल, मॉक इंटरव्ह्यू, ग्रुप डिस्कशन, कम्युनिकेशन स्किल्स, प्रोफेशनल रायटिंग आदींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळते. विभागाचा अभ्यासक्रम सुध्दा आधुनिक व्यवसायाच्या गरजांनुसार तयार करण्यात आला आहे. दोन वर्षांच्या या अभ्यासक्रमात फायनान्स, मार्केटिंग, ह्युमन रिसोर्सेस, ऑपरेशन्स आणि बिझनेस ॲनालिटिक्स यांसारख्या मुख्य विषयांचा समावेश आहे. तसेच इंटर्नशिप, औद्योगिक भेटी आणि अतिथी व्याख्यानांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव दिला जातो. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच विभागप्रमुख डॉ. डी. वाय. चाचरकर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ :
# प्रगती, नवोपक्रम आणि मूल्यांचा गौरवशाली प्रवास
# १ मे २०२६ वर्धापन दिन विशेष लेख



शिक्षण हीच ती शक्ती आहे, जी समाजात परिवर्तन घडवून आणू शकते, या उदात्त विचारावर वाटचाल करणारे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आज केवळ पदव्या देणारे केंद्र राहिलेले नाही, तर ते जबाबदार नागरिक, उत्कृष्ट संशोधक, नवउद्योजक आणि सक्षम नेतृत्व घडवणारे एक सशक्त व प्रभावशाली व्यासपीठ बनले आहे. १ मे २०२६ रोजी आपला ४३ वा वर्धापन दिन साजरा करत असताना, विद्यापीठाने गेल्या काही वर्षांत शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, नवोपक्रम, पायाभूत सुविधा आणि सामाजिक बांधिलकीच्या क्षेत्रात जी गरुडझेप घेतली आहे, ती निश्चितच अभिमानास्पद आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असलेल्या या विद्यापीठाचा हा प्रवास राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एन.ई.पी. २०२०) यशस्वी अंमलबजावणीतून आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जागतिक स्तरावर आपली मोहोर उमटवत आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि आधुनिक शिक्षणाची कास**

आजचा काळ हा केवळ पुस्तकी ज्ञानाचा राहिलेला नाही, तर तो कौशल्य, नवकल्पना (इन्नोव्हेशन) आणि नैतिक मूल्यांचा आहे. हीच काळाची पावले ओळखून विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बहुविध संधी, प्रत्यक्ष अनुभव आणि रोजगाराभिमुख शिक्षण देण्याचा ध्यास घेतला आहे. यासाठी इंटर्नशिप पोर्टलची सुरुवात करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता यावा, यासाठी ठोस पावले उचलली गेली आहेत. उद्योगक्षेत्राच्या गरजा ओळखून ए.ई.डी.पी. अंतर्गत बी.एस्सी. (डेटा सायन्स अँड ॲनॅलिटिक्स) आणि बी.कॉम. (रिटेल मॅनेजमेंट) यांसारखे नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्यात आले असून, त्यासाठी उद्योगांशी सामंजस्य कराराही करण्यात आले आहेत. आगामी काळात संलग्नित महाविद्यालयांमध्येही हे अभ्यासक्रम राबविले जाणार आहेत.

शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे नाते केवळ अभ्यासक्रम शिकवण्यापुरते मर्यादित न ठेवता, विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधिष्ठित विचार, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेम रुजविण्याचे महान कार्य विद्यापीठातील प्राध्यापक करत आहेत. संविधानातील मूल्ये आत्मसात करून प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठेने जीवन जगण्याचा संदेश विद्यापीठ विद्यार्थ्यांना देत आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि जागतिक तंत्रज्ञानाकडे वाटचाल

तंत्रज्ञानाच्या या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डेटा सायन्स, आणि बायोटेक्नॉलॉजी या क्षेत्रांत भारत जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करत आहे, यात अमरावती विद्यापीठाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. येणारा काळ हा 'ए.आय.' चा आहे, हे ओळखून विद्यापीठाने 'सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग' स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे २५ कोटी रुपयांचा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रस्ताव पाठविला आहे. यामुळे विद्यापीठाचे संशोधन जागतिक दर्जाचे होणार आहे. विशेष म्हणजे, विद्या परिषदेने चारही विद्याशाखेतील पदवी (युजी) प्रोग्रामच्या पाचव्या सेमिस्टरला 'इंट्रोडक्शन टू ए.आय.' हा विषय अनिवार्य करून एका नव्या क्रांतीची सुरुवात केली आहे.

विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान मिळावे यासाठी विद्यापीठाचे इंटरनेट नेटवर्क १ जी.बी.पी.एस. वरून तब्बल १० जी.बी.पी.एस. पर्यंत अद्ययावत केले जात आहे. या प्रकल्पासाठी ३.१५ कोटी रुपये खर्चून अत्याधुनिक फायरवॉल, कोअर स्विचेस आणि ओ.एफ.सी. प्रणाली उभारली जात आहे. पीएम-उषा अंतर्गत मिळालेल्या अनुदानातून विद्यापीठ परिसरात ७५ नवीन वायफाय ॲक्सेस पॉईंट्स बसवले असून, लवकरच आणखी ५० पॉईंट्स जोडून कनेक्टिव्हिटी अधिक भक्कम केली जाणार आहे. यामुळे हे विद्यापीठ खऱ्या अर्थाने 'नेक्स्ट जनरेशन' शैक्षणिक केंद्र बनत आहे.

**संशोधन, पेटंट आणि आंतरराष्ट्रीय यश**

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात संशोधनाची एक नवी लाट आली आहे. संशोधकांना पेटंट नोंदविण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नवीन आय.पी.आर. (पेटंट) पॉलिसी अपलोड करण्यात आली आहे. व्यवस्थापन शास्त्र (एम.बी.ए.) विभागाचे प्रमुख डॉ. दिपक चाचरकर आणि त्यांच्या सहकायांनी 'बाऊंडेड रॅशनॅलिटी कॅलक्युलेटर' साठी मिळिवलेला कॉपीराईट हा विद्यापीठाच्या बौद्धिक क्षमतेचा मोठा पुरावा आहे.

बायोटेक्नॉलॉजी विभागाने तर संशोधनात उत्तुंग शिखरे गाठली आहेत. डॉ. अनिता पाटील यांना मिळालेला 'बेस्ट सीनियर सायंटिस्ट' पुरस्कार त्यांच्या संशोधनाची पावती देतो. हर्बल उत्पादने विकास आणि प्रमाणीकरण केंद्र या अठरा लाख रुपयांचा भरीव निधी मिळालेल्या प्रकल्पाला सुरुवात होत आहे. संगणकशास्त्र विभागातील डॉ. रत्नशील खोब्रागडे यांना मिळालेले पेटंट ही विद्यापीठासाठी गौरवाची बाब आहे. तसेच पूजा मांडविय, डॉ. प्रशांत ठाकरे आणि डॉ. निरज धनवटे यांच्या संशोधन निबंधाला आंतरराष्ट्रीय परिषदेत दुसरे पारितोषिक आणि 'साऊथ आफ्रिकेचे पेटंट' मिळाले आहे. दुसया आंतरराष्ट्रीय पर्यावरण शाश्वतता परिषदेत पीएचडी स्कॉलर कु. अनघा उंदरीवाडे आणि डॉ. अनिता पाटील यांना प्रथम पारितोषिक मिळाले. अचल जाधव आणि दिव्या अंबाडकर या विद्यार्थिनींची जर्मनीतील नामांकित विद्यापीठात ए.आय. च्या उच्च शिक्षणासाठी झालेली निवड विद्यापीठाचा जागतिक दबदबा वाढवत आहे.

**स्टार्टअप्स, नवउद्योजकता आणि जागतिक ओळख**

आपले विद्यापीठ आता केवळ शिक्षणाचे केंद्र न राहता 'इन्नोव्हेशन आणि उद्योजकतेचे' मोठे केंद्र बनत आहे. इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून स्टार्टअप्सना 'सीड फंड' दिला जात आहे. केंद्र शासनाच्या स्टार्टअप इंडिया सीड फंड योजनेंतर्गत अमरावती विद्यापीठातील ७ स्टार्टअपची निवड झाली. या स्टार्टअप्सला ५२ लक्ष रुपयाचा सीड फंड देण्यात आला, हे मोठे यश मानल्या जाते. शालेय विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करण्यासाठी नुकतेच 'ज्युनिअर हॅकेथॉन' चे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले. आनंद यादव यांच्या 'स्टार्टअप की यात्रा' या पुस्तकाची जागतिक पुस्तक मेळाव्यात झालेली निवड विद्यापीठाच्या बौद्धिक संपदेचा सन्मान आहे.

विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती व उद्योजकता निर्माण होण्यासाठी बूट कॅम्प, आयडियाथॉन, बिझिनेस प्लॅन कॉम्पिटिशन अशाप्रकारचे उपक्रम विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयात राबविले, त्यामुळे स्टार्टअप एक्स्पो २०२६ मध्ये मोठा सहभाग राहिला. जागतिक स्तरावर ओळख निर्माण करण्यासाठी आफ्रिकन आणि इतर देशांतील विद्यापीठांशी संपर्क साधून १२ परदेशी विद्यापीठांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

**पायाभूत सुविधांचा विकास आणि नवीन उपक्रम**

पीएम–उषा योजनेंतर्गत तब्बल ४० कोटी रुपये खर्चून विद्यापीठात बहुउद्देशीय सभागृह, मुलींचे वसतिगृह, क्लासरुम कॉम्प्लेक्स, बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजचे बांधकाम, तसेच फिजिकल एज्युकेशन आणि बायोटेक सारख्या विभागांचे नूतनीकरण वेगाने सुरू आहे. अकोला येथे उपकेंद्र स्थापन करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविला असून, चिखलदरा येथे 'ट्रायबल स्कील डेव्हलपमेंट सेंटर' चा प्रस्तावही शासनाधीन आहे. सेंटर फॉर मॉलिक्युलर डायग्नोसिस ॲण्ड रिसर्चची स्थापना झाली असून 'पीजी डिप्लोमा इन मॉलिक्युलर डायग्नोसिस ऑफ इन्फेक्शिअस डिसीजेस' हा अभ्यासक्रम जून २०२६ पासून सुरू होत आहे.

**सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातील ऐतिहासिक सुवर्णभरारी**

शैक्षणिक यशासोबतच विद्यार्थ्यांच्या कला आणि क्रीडा गुणांना वाव देण्याचे मोठे काम विद्यापीठ करत आहे. गेल्या वर्षभरात सांस्कृतिक क्षेत्रात विद्यापीठाने 'न भूतो न भविष्यती' अशी कामगिरी केली आहे. एम.जी.एम. विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित ३९ व्या मध्य विभाग आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात विद्यापीठाने २३ विद्यापीठांना मागे टाकत, इतिहासात पहिल्यांदाच २४ पारितोषिकांसह ऐतिहासिक 'चॅम्पियनशिप' पटकावून सुवर्ण इतिहास रचला ! तसेच जळगाव येथील 'इंद्रधनुष्य' युवा महोत्सवात आठ पारितोषिके मिळवली. अमरावती येथील श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयात आयोजित युवा महोत्सवात तीनहजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अखिल भारतीय विद्यापीठ संघ, नवी दिल्लीच्यावतीने शुलिनी विद्यापीठ, सोलन (हिमाचल प्रदेश) येथे संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय संशोधन महोत्सव 'अन्वेषण – २०२६' या स्पर्धेत अमरावती विद्यापीठाचा संशोधक विद्यार्थी श्री अजिंक्य पोटे याने प्रथम क्रमांक प्राप्त करुन विद्यापीठाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव वाढविला.

परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवात अमरावती विद्यापीटाने आठ पारितोषिकांसह तिसरे स्थान मिळिवले.राज्यस्तरीय उत्कर्ष स्पर्धेत विद्यापीठाच्या रासेयो चमूची उत्कृष्ट कामगिरी राहिली. क्रीडा क्षेत्रातही आपले विद्यार्थी मागे नाहीत. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल पुरुष व महिला स्पर्धा विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे संपन्न झाली. या स्पर्धेत प्रथमतःच पुरुष व महिला चमूने प्रथम क्रमांक प्राप्त करुन विद्यापीठाचा नावलौकीक राष्ट्रीय स्तरावर पोहचविला. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठात संपन्न झालेल्या राज्यस्तरीय आव्हान स्पर्धेत अमरावती विद्यापीठाने उत्कृष्ट विद्यापीठ पुरस्काराचा सर्वोच्च बहुमानाचा फिरता चषक पटकावून राज्याच्या शैक्षणिक नकाशावर आपले नांव कोरले.यशदीप भोगे या विद्यार्थ्याने एशियन आर्चरी चॅम्पियन स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून विद्यापीठाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेले. मुलांच्या फुटबॉल संघाने पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ स्पर्धेत प्रथम स्थान मिळवले, तर ज्युदो आणि वेटलिफ्टिंग मध्येही खेळाडूंनी राष्ट्रीय यश मिळवले. खेळाडूंसाठी अद्ययावत क्रीडा संकुल आणि सिंथेटिक ट्रॅकची उभारणी करण्याचे विद्यापीठाचे नियोजन आहे.

**सामाजिक बांधिलकी आणि संत गाडगे बाबांची दशसूत्री**

संत गाडगे बाबांच्या नावाने ओळखले जाणारे हे विद्यापीठ बाबांच्या दशसूत्रीचे काटेकोरपणे पालन करत आहे. कुलगुरूंनी स्वतः सप्तनीक अनाथ, निराधार मुलींचे कन्यादान केले, तसेच संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राच्यावतीने गरजूंना वस्त्रदान करण्यात आले. ज्या ठिकाणी गाडगे बाबांनी अखेरचा श्वास घेतला, त्या वलगाव येथील आश्रमात वृद्धांना कुलगुरूंच्या हस्ते शालींचे वाटप करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या २७,६०० स्वयंसेवकांची फौज आज समाजसेवेचे व्रत घेऊन कार्यरत आहे. प्रजासत्ताक दिनाच्या परेडपासून ते कुल्लू मनाली येथील नॅशनल ॲडव्हेंचर कॅम्पपर्यंत विद्यार्थ्यांनी आपला ठसा उमटवला आहे. पर्यावरण रक्षणाचा वसा घेत विद्यापीठात १,१११ रोपट्यांचे वृक्षारोपण करण्यात आले. अमरावती महानगरपालिकेला केंद्र शासनाचा 'स्वच्छ हवेसाठी' देशातून जो प्रथम पुरस्कार मिळाला, त्यात विद्यापीठाच्या निसर्गरम्य आणि हिरव्यागार परिसराचे मोठे योगदान आहे.

विद्यापीठाने माजी विद्यार्थ्यांचा 'ऋणानुबंध' भव्य माजी विद्यार्थी मेळाव्याचे नेत्रदिपक आयोजन केले. या मेळाव्यात देश–विदेशातील विद्यार्थी सहभागी झाले होते. याच मेळाव्यात यु.डी.आर.एफ. मध्ये प्रथम क्रमांक मिळिवल्याबद्दल भौतिकशास्त्र विभाग, व्दितीय संगणकशास्त्र व तृतीय बायोटेक्नॉलॉजी विभागाचा कुलगुरूंनी सत्कार केला.

विद्यापीठाचे पुरस्कार

विद्यापीठ पर्यावरण पुरस्कार २०२४ चा संस्था गटात जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर, जि. अमरावती या महाविद्यालयाला, तर व्यक्ती गटात नारायणराव नागरे महाविद्यालय, दुसरबिड, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणाचे प्राचार्य डॉ. विजय हिम्मतराव नागरे यांना प्रदान करण्यात आले. तर २०२५ चा संस्था गटात मातोश्री सुभद्राबाई पाटील कला, विज्ञान व कै. पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय, मानोरा, जि. वाशीम या महाविद्यालयाला, तर व्यक्ती गटात अमरावतीचे श्री वसंत माणिकराव पाटील यांना प्रदान करण्यात आला. कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृती प्रित्यर्थ दिला जाणारा संत गाडगेबाबा सामाजिक कार्य पुरस्कार संस्था गटात दिव्या फाउंडेशन, वरवंड, जि. बुलडाणा या संस्थेला, तर व्यक्तिगटात अमरावती येथील श्री मनिष पावडे यांना प्रदान करण्यात आला.

विद्यापीठ स्थापना दिवस १ मे रोजी विद्यापीठ आणि महाविद्यालयातील शिक्षक अधिकारी व कर्मचा–यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यावर्षी हा पुरस्कार विद्यापीठ शिक्षक संवर्गामध्ये गृहविज्ञान विभागातील डॉ. संयोगिता विलास देशमुख यांना, प्रथम श्रेणी अधिकारी संवर्गात परीक्षा विभागातील सहाय्यक कुलसचिव श्री मिलींद दत्तात्रय देशपांडे, महाविद्यालय विभागाच्या सहाय्यक कुलसचिव डॉ. साक्षी संजयसिंह ठाकूर यांना, द्वितीय श्रेणी संवर्गात आस्थापना विभाग अधीक्षक श्री अमोल अशोकराव म्हैसाळकर, परीक्षा विभागाच्या अधीक्षक सौ. स्मिता अमोल म्हैसाळकर यांना, तृतीय श्रेणी कर्मचारी संवर्गात वित्त विभागातील वरिष्ठ सहाय्यक श्री संजय गुलाबराव कोकाटे, ज्ञानस्त्रोत केंद्र येथील ग्रंथालय सहाय्यक कु. ज्योती तुकाराम गेडाम यांना, तर चतुर्थ श्रेणी कर्मचारी संवर्गात सामान्य प्रशासन विभागातील चौकीदार श्री मोरेश्वर शंकर आप्पा मुंजाळे यांना घोषित झाला आहे.

संलग्नित महाविद्यालय, स्वायत्त महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था वर्गवारी प्राचार्य संवर्गात इंदिरा महाविद्यालय, कळंब येथील प्राचार्य डॉ. पवन भाऊ मांडवकर यांना, संलग्नित महाविद्यालय शिक्षक संवर्गात गो.सी. टोम्पे कला व वाणिज्य महाविद्यालय, चांदूरबाजार येथील रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. नंदकिशोर दिनकरराव गव्हाळे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. जयश्री दीपक धोटे यांना, तर शिक्षकेतर कर्मचारी संवर्गात इंदिराबाई महिला महाविद्यालय, अमरावतीचे अधीक्षक श्री प्रशांत केशवराव देशमुख यांना घोषित झाला आहे. नाविन्यपूर्ण उपक्रमामध्ये 'एन.ई.पी. स्कुल कनेक्ट' साठी भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा या महाविद्यालयाची निवड झाली आहे. सर्वांचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी अभिनंदन केले आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा हा वर्धापन दिन केवळ एका वर्षाची सांगता नसून, नव्या युगाच्या आव्हानांना सामोरे जाण्याची एक नवी सुरुवात आहे. कौशल्य हेच चलन असलेल्या आजच्या जगात, संत गाडगे बाबांच्या स्वच्छतेच्या व कर्मयोगाच्या विचारांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन हे विद्यापीठ विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर नेण्याचे स्वप्न साकार करत आहे. सशक्त, समतावादी आणि विकसित भारताच्या उभारणीसाठी ज्ञान, संशोधन आणि समाजसेवा यांचा अनोखा संगम या विद्यापीठात पाहायला मिळत आहे.

वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या कुशल नेतृत्वाखाली विद्यापीठ विकासाचा रथ घौडदौड करीत असून या विद्यापीठाला मनुष्यबळ कमी जरी असले तरी असलेले मनुष्यबळ विद्यापीठाच्या विकासात त्यांना समर्थपणे साथ देत आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची विकासात्मक वाटचाल सुरू असून या विद्यापीठाच्या वाटचालीत अनेकांचे परिश्रम फळाला लागले आहेत. विद्यापीठाच्या ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा

**डॉ. विलास नांदुरकर**
**जनसंपर्क अधिकारी,**
**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

## - जयंती विशेष -



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महात्मा बसवेश्वर जयंती साजरी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला उपकुलसचिव (विकास) डॉ. सुलभा पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व महात्मा बसवेश्वर यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी






राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. याप्रसंगी वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

# The Hitavada

## 'Students should cultivate discipline, critical thinking'

■ Amravati Bureau
AMRAVATI, Mar 30


Guest guiding at the workshop at SGBAU.

A WORKSHOP on the topic 'Personality development through the thoughts of Swami Vivekananda' was organised at Sant Gadge Baba University, emphasising practical application of Swami Vivekananda's philosophy in life. The programme was jointly hosted by the Swami Vivekananda Study Centre, Student Development Department and the National Service Scheme (NSS) of SGBAU.

Delivering the inaugural address, Dr Jogendra Singh Bisen, Pro-Vice Chancellor of Yashwantrao Chavan Open University, said that the religion Swami Vivekananda advocated was not about rituals or ceremonies, but service to the nation. He explained that Swami Vivekananda's concept of religion was centered on *karma* (duty) and responsibility. Dr Bisen highlighted that a conscious and awakened society progresses through knowledge, ethics and dedicated action and urged students to cultivate self-discipline and critical thinking from college life onwards.

Illustrating Swami Vivekananda's resilience, Dr Bisen recounted the time when Vivekananda swam to an island in Kanyakumari, demonstrating that confidence and determination help overcome major challenges. He also spoke on Swami Vivekananda's participation in the World Parliament of Religions in Chicago, emphasising that strong character is the nation's greatest asset.

Students were encouraged to break social barriers, promote harmony and view the nation as the highest form of service and duty.

Dr Nitin Koli, Director of Examinations and Acting Registrar presided over the programme. While Dr Bhaiyasaheb Metkar and Dr N R Pawar, members of the University Management Council, Dr Nilesh Kadu, NSS Director and Dr Rajiv Borkar, Student Development Director were present as the chief guests.

Dr Koli, in his presidential address, stressed on the importance of technological proficiency while cautioning against its misuse, noting that true global leadership requires wisdom and moral strength not just economic growth.

The workshop commenced with the worship of idols of Sant Gadge Baba and Swami Vivekananda, lamp lighting and the university anthem.

Dr Rajiv Borkar outlined the objectives of the programme and top performers of the quiz competition organised by the Swami Vivekananda Study Centre were honored with certificates, books and cash prizes.

The session was conducted by Dr Abhijit Ingle while Dr Nilesh Kadu proposed a vote of thanks.

## विद्यापीठाच्या एम.बी.ए. विभागातील 33 विद्यार्थ्यांना मिळाली नोकरी

अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवसाय प्रशासन आणि व्यवस्थापन विभागातील ३३ विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये एचआर एक्झिक्युटिव्ह, सेल्स एक्झिक्युटिव्ह, क्लस्टर असिस्टंट आणि सीआरएम अशा पदांवर नोकरी मिळाली आहे. सध्याच्या तणावपूर्ण आणि अनिश्चित परिस्थितीत रोजगाराच्या संधी कमी झाल्या आहेत. अशा कठीण काळात विद्यार्थ्यांसाठी नोकरी मिळवणे मोठे आव्हान बनले आहे. मात्र, या सर्व अडचणींवर मात करत विद्यापीठाच्या एमबीए विभागाने विद्यार्थ्यांचे यशस्वी प्लेसमेंट करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. प्लेसमेंट प्रक्रिया अद्याप सुरू असून येत्या काही आठवड्यात आणखी विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध होण्याची शक्यता एमबीए विभागाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. व्ही. आर. ऑगस्टीन यांनी व्यक्त केली.



## विद्यार्थ्यांनी स्टार्टअपला करिअर म्हणून प्राधान्य द्यावे: कुलगुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या रिसर्च अँन्ड इन्क्युबेशन फाउंडेशनद्वारे इन्क्युबेशन सेंटरमध्ये पार पडलेल्या कार्यक्रमात २ एप्रिल रोजी दोन उदयोन्मुख स्टार्टअप्सना 'सीड फंड' (बीज भांडवल) चे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य नावीन्यपूर्ण सोसायटीच्या अर्थसहाय्याने या निधीचे वितरण करण्यात आले. डंग्स अँन्ड हर्ब्स प्रा. लि.ला २ लक्ष व कृष्णामय आयुरयोग प्रा. लि.ला २.५ लक्ष सीड फंडचे वितरण करण्यात आले. इन्क्युबेशन सेंटर प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहून पैसे कमवण्यासोबतच समाजातील प्रश्न सोडवून इतरांनाही रोजगार उपलब्ध करून देण्याचे समाधान स्टार्टअप्सच्या माध्यमातून मिळू शकते. एकूण स्टार्टअप्सपैकी ४८ टक्के व्यवसायांमध्ये किमान एक महिला संस्थापक किंवा संचालिका आहे. महिला सक्षमीकरणाचे हे एक उत्तम उदाहरण असल्याचेही कुलगुरू म्हणाले.

इन्क्युबेशन सेंटर प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर यांनी सेंटरमधील उपक्रमांबाबत माहिती दिली. संचालन व आभार सेंटरचे व्यवस्थापक अमोल हिरुळकर यांनी मानले. कार्यक्रमाला शासकीय तंत्रनिकेतनमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नरेश मोवळे, रवी ढेंगळे, भावेश वारके यांनी अथक परिश्रम घेतले.

पुण्य नगरी मंगळवार, ३१ मार्च २०२६

# विद्यापीठात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा निरोप समारंभ

**पुण्य नगरी / प्रतिनिधी**



**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही. एच. नागरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, उपकुलसचिव तथा प्रभारी वित्त व लेखा अधिकारी मंगेश वरखेडे, कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, सत्कारमूर्ती अनिल काळबांडे, अनिल काळे, माधव वारके, मुरलीधर चिलुरकार, किशोर गजघुमे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर उपस्थित होते. यावेळी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी सर्वश्री अनिल काळबांडे, अनिल काळे, माधव बारके, मुरलीधर चिलुरकार व किशोर गजघुमे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार केला. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने अध्यक्ष मंगेश वरखेडे, उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, सचिव डॉ. श्रीकांत तायडे, राजेश एडले यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश व पुस्तक देऊन सत्कार केला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर तर आभार प्रदर्शन अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी केले.

The Hitavada

# 'Skill devpt as critical as degree for career growth today'

■ **Amravati Bureau**
AMRAVATI, Apr 2



Dr Nitin Koli guiding the programme.

"OBTAINING a degree alone is not sufficient, skill development is equally critical for career growth in today's rapidly advancing technological era," Dr H R Deshmukh, Head of the Faculty of Science and Technology. He was speaking at the inauguration of the Pandit Deendayal Upadhyay Employment Fair, organised jointly by the Student Development Department, Skill Development, Employment and Entrepreneurship Department of Sant Gadge Baba Amravati University and the District Skill Development Centre.

The inauguration ceremony was attended by prominent dignitaries including Dr Nitin Koli, Director of the Board of Examination and Evaluation and incharge Registrar, D L Thakre, Deputy Commissioner, Pranjali Barskar, Assistant Commissioner, Dr Rajiv Borkar, Director of Student Development Department, Dr Prashant Shingwekar and Rahul Patel and Pratik Agrawal, both the coordinators from Tata Consultancy Services (TCS) were prominently present. A total of 477 students registered for the fair out of which 288 appeared for the aptitude test. Following the assessments, 38 students were successfully selected for jobs. Speaking on skill development, Dr Deshmukh stressed on the importance of youth acquiring diverse skills to make India a developed nation. He urged students to gain employable skills and be prepared for competitive careers.

Dr Nitin Koli highlighted India's resilience amid global conflicts and economic uncertainties. He noted that the fair provides an excellent opportunity for students from traditional courses like BA, B Com, and B.Sc to secure careers in reputed companies.

D L Thakre encouraged students not only to pursue jobs but also to dream of starting their own ventures, however small and to embrace entrepreneurship.

He emphasised that TCS can serve as important springboard for young aspirants, helping them transition into successful entrepreneurs. The event began with worship of Sant Gadge Baba and Pandit Deendayal Upadhyay, followed by lamp lighting and the University anthem. Dr Rajiv Borkar, Director of Student Development, delivered introductory speech. The programme was conducted by Akshay Doijad while Pranjali Barskar proposed a vote of thanks.

**दैनिक भास्कर**

# दो स्टार्टअप्स को प्रदान किया गया सीड फंड

## दो नवाचार कंपनियों को मिला आर्थिक सहयोग

भास्कर डेस्क | अमरावती



संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय के रिसर्च एंड इन्क्यूबेशन फाउंडेशन द्वारा दो उभरते स्टार्टअप्स को सीड फंड (बीज पूंजी) वितरित किया गया। यह वितरण कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते के हाथों इन्क्यूबेशन सेंटर में आयोजित कार्यक्रम में हुआ।

महाराष्ट्र राज्य नवाचार सोसायटी के सहयोग से डंग्स एंड हर्ब्स प्रा. लि. को 2 लाख रुपये तथा कृष्णामय आयुरयोग प्रा. लि. को 2.5 लाख रुपये का सीड फंड प्रदान किया गया। इस अवसर पर इन्क्यूबेशन सेंटर प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर और मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव उपस्थित थे।


कुलगुरु डॉ. बारहाते ने विद्यार्थियों से स्टार्टअप को करियर के रूप में अपनाने का आह्वान करते हुए कहा कि विश्वविद्यालय के माध्यम से उन्हें आर्थिक व तकनीकी सहायता दी जा रही है। उन्होंने बताया कि आज देश में स्टार्टअप्स की संख्या 500 से बढ़कर 2 लाख से अधिक हो चुकी है, जिसमें छोटे शहरों का भी महत्वपूर्ण योगदान है। उन्होंने यह भी कहा कि स्टार्टअप्स के माध्यम से युवा न केवल आत्मनिर्भर बन सकते हैं, बल्कि रोजगार सृजन कर समाज की समस्याओं का समाधान भी कर सकते हैं। कार्यक्रम में बड़ी संख्या में छात्र उपस्थित थे।

**वृत्त केसरी**

# शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात अंधश्रध्देला थारा नाही

## डॉ. श्रीकांत पाटील यांचे प्रतिपादन

### विद्यापीठ आजीवन अध्ययन विभागात छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी



प्रतिनिधी/वृत्त केसरी

अमरावती, ४ एप्रिल - छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारात पारदर्शकता, न्यायप्रियता आणि सुयोग्य प्रशासन यावर विशेष प्रकाश टाकतांना आजच्या काळात प्रभावी नेतृत्व आणि सुशासन यासाठी शिवाजी महाराजांचे तत्त्वज्ञान अत्यंत मार्गदर्शक ठरते. विद्यार्थी तसेच तरुण पिढीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा सखोल अभ्यास करून प्रत्यक्ष जीवनात उतरवणे ही काळाची गरज आहे. सोबतच सध्या महाराष्ट्रात सुरू असलेल्या भोंदूगिरी सारख्या प्रकाराला छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात थारा नव्हता, असे प्रतिपादन डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले. आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त एक अत्यंत भावपूर्ण, प्रेरणादायी आणि शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ परिसरात आयोजित या कार्यक्रमात इतिहास, व्यवस्थापन आणि राष्ट्रनिष्ठा यांचा संगम अनुभवायला मिळाला. अध्यक्षस्थानी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, एम.ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा आणि व्यवस्थापन अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. भैय्यासाहेब चिखले, प्रमुख वक्ते डॉ. वैभव म्हस्के, पंचवटे सर, सुरेश रहाटे उपस्थित होते. प्रमुख वक्ते डॉ. वैभव म्हस्के यांनी आपल्या सखोल आणि अभ्यासपूर्ण भाषणातून शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा विविध अंगांनी परामर्श घेतला.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सुध्दा शिवाजी महाराजांवर विचार मांडले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. डॉ. भैय्यासाहेब चिखले यांनी प्रास्ताविकेतून शिवाजी महाराजांच्या विचारधारेचा शैक्षणिक अभ्यासक्रमाशी असलेला निकट संबंध अधोरेखित केला. संचालन प्रा. भूषण घोंगडे, आभार अमित शिंदे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

हिंदुस्थान

# शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात अंधश्रध्देला थारा नाही : डॉ. श्रीकांत पाटील

## विद्यापीठातील आजीवन अध्ययन विभागात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



अमरावती दि. ४ : छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारात पारदर्शकता, न्यायप्रियता आणि सुयोग्य प्रशासन यावर विशेष प्रकाश टाकतांना आजच्या काळात प्रभावी नेतृत्व आणि सुशासन साठी शिवाजी महाराजांचे तत्वज्ञान अत्यंत मार्गदर्शक ठरते. विद्यार्थी तसेच तरुण पिढीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा सखोल अभ्यास करून प्रत्यक्ष जीवनात उतरवणे ही काळाची गरज आहे. सोबतच सध्या महाराष्ट्रात सुरू असलेल्या भोंदूगिरी सारख्या प्रकाराला छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात थारा नव्हता असे, प्रतिपादन डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले. आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त एक अत्यंत भावपूर्ण, प्रेरणादायी आणि शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ परिसरात आयोजित या कार्यक्रमात इतिहास, व्यवस्थापन आणि राष्ट्रनिष्ठा यांचा संगम अनुभवायला मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, एम.ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा आणि व्यवस्थापन अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. भैय्यासाहेब खिरडे, प्रमुख वक्ते डॉ. वैभव मस्के, पंचवटे सर, सुरेश रहाटे उपस्थित होते.


प्रमुख वक्ते डॉ. वैभव मस्के यांनी आपल्या सखोल आणि अभ्यासपूर्ण भाषणातून शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध अंगांनी परामर्श घेतला. त्यांनी महाराजांची युद्धनीती, प्रशासन, गनिमी कावा, सागरी सामर्थ्य, लोककल्याणकारी राज्यकारभार यांचा उल्लेख करत त्यांच्या कार्याचे आधुनिक काळातील व्यवस्थापनशास्त्राशी असलेले संबंध स्पष्ट केले. शिवाजी महाराज हे केवळ एक पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते एक उत्कृष्ट व्यवस्थापक, दूरदर्शी नेतृत्व आणि लोकाभिमुख राजा होते, असे ते म्हणाले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सुद्धा शिवाजी महाराजांवर विचार मांडले. त्या काहीशी घोषणांमुळे वातावरण अधिक प्रेरणादायी केले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. डॉ. भैय्यासाहेब खिरडे यांनी प्रास्ताविकेतून शिवाजी महाराजांच्या विचारधारेच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाशी असलेला निकट संबंध अधोरेखित केला. सूत्रसंचालन प्रा. भूषण धोंगडे, आभार अमित शिंदे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाला विभागातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवभारत मंगलवार 7 अप्रैल 2026

# स्वराज्य में अंधविश्वास को नहीं मिला कोई स्थान

## डॉ. श्रीकांत पाटिल का प्रतिपादन



■ अमरावती, ब्यूरो. संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के 'आजीवन अध्ययन एवं विस्तार विभाग' द्वारा स्वराज्य के संस्थापक छत्रपति शिवाजी महाराज की पुण्यतिथि पर अभिवादन किया गया. कार्यक्रम में वक्ताओं ने शिवाजी महाराज के शासन, उनके प्रबंधन कौशल और उनकी प्रगतिशील विचारधारा पर प्रकाश डाला. अध्यक्षता कर रहे विभाग के निदेशक डॉ. श्रीकांत पाटिल ने अपने संबोधन में कहा कि छत्रपति शिवाजी महाराज का शासन पारदर्शिता, न्यायप्रियता और सुशासन का प्रतीक था. वर्तमान में जो पाखंड और अंधविश्वास (भोंदूगिरी) समाज में दिखाई देता है, उसके लिए महाराज के स्वराज्य में कोई स्थान नहीं था. शिवाजी महाराज का दर्शन आज के नेतृत्व और सुशासन के लिए सबसे बड़ा मार्गदर्शक है. युवा महाराज के विचारों का केवल गुणगान न करें, बल्कि उन्हें अपने वास्तविक जीवन में उतारें.

### आधुनिक प्रबंधन के गुरु थे शिवाजी महाराज : मुख्य वक्ता डॉ. वैभव मस्के

ने महाराज की युद्धनीति, प्रशासन, गुरिल्ला युद्ध (गनिमी कावा) और समुद्री शक्ति पर विस्तार से चर्चा की. उन्होंने बताया कि महाराज केवल एक योद्धा नहीं थे, बल्कि एक दूरदर्शी राजा और कुशल प्रबंधक भी थे. उनके कार्यों का सीधा संबंध आधुनिक 'मैनेजमेंट साइंस' से जुड़ता है. प्रस्तावना में डॉ. भैय्यासाहेब खिरडे ने महाराज की विचारधारा और शैक्षणिक पाठ्यक्रम के अंतर्संबंधों को रेखांकित किया. विद्यार्थियों ने भी महाराज के जीवन पर अपने विचार व्यक्त किए और उत्साहवर्धक नारों से वातावरण को ओजस्वी बना दिया. इस समय पंचवटे, सुरेश रहाटे सहित बड़ी संख्या में प्राध्यापक, कर्मचारी और छात्र उपस्थित थे. संचालन प्रा. भूषण धोंगडे तथा आभार अमित शिंदे ने माना. समापन राष्ट्रगान के साथ हुआ.

# अ.भा. अंतर विश्वविद्यालय राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा में अमरावती विद्यापीठ प्रथम

भास्कर डेस्क| अमरावती. ऑल इंडिया यूनिवर्सिटीज द्वारा मौलाना आजाद नेशनल उर्दू विश्वविद्यालय, हैदराबाद में 1-2 अप्रैल के दौरान आयोजित अखिल भारतीय अंतर-विश्वविद्यालय राष्ट्रीय कव्वाली प्रतियोगिता में संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय की टीम ने शानदार प्रदर्शन करते हुए प्रतिष्ठित प्रथम पुरस्कार हासिल कर इतिहास रच दिया। इस उपलब्धि पर टीम की सर्वत्र सराहना की जा रही है।टीम में ओम कराले, अजय हागे, गजानन पलसकर, कल्याणी सावके, आचल सरदार, शर्वरी देशमुख, ईश्वरी इंगले, गौरी लढ्ढा, साक्षी वानखडे और गौरी मलथानकर शामिल थे। साथ ही तबला वादक हितेश व्यास, ढोलकी वादक कार्तिक नंदवंशी और हार्मोनियम वादक अमर कतोरे ने संगत दी।

टीम मैनेजर के रूप में डॉ. अभिजीत अणे और डॉ. राधिका देशमुख का सहयोग रहा।इस वर्ष विद्यार्थी विकास विभाग के अंतर्गत आयोजित विभिन्न प्रतियोगिताओं में उत्कृष्ट प्रदर्शन के लिए कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे और विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर ने टीम को बधाई दी।

The Hitavada

# 'Research must reach market to gain real value'

■ Amravati Bureau
AMRAVATI, Apr 8

"TODAY, we have access to all modern facilities, but even in the absence of such resources in the past, many individuals created remarkable innovations that are still admired today. Innovations are happening around us even now, but we often tend to ignore them. Students must build self-confidence, overcome inferiority complexes, and connect their ideas with research," said Dr Yogesh Brahmankar, Director of the Innovation Cell, Ministry of Education, Government of India.

Dr Brahmankar was speaking at a special interactive programme titled 'Visionary: An interaction with Dr Yogesh Brahmankar', organised by the Department of Biotechnology, Sant Gadge Baba Amravati University (SGBAU). He further emphasised that research should not stop at innovation alone, but efforts must be made to ensure that research outcomes reach the market. "Only when research reaches consumers does it gain real value," he added.



One of the guests guiding the programme.

Dr Brahmankar advised students to adopt a consumer-oriented mindset while developing research tools, similar to the approach taken while purchasing any product. He stressed the importance of introducing research products to the market and identifying shortcomings through customer feedback. Encouraging a practical approach, he urged students to view their innovations from a commercial perspective and focus more on experimental work. He also answered queries from students and provided valuable guidance on innovation and research tools.

The programme was presided over by Dr Prasad Wadegaonkar, Head of the Department of Biotechnology. Dr Ajay Lad, Director of Innovation, Incubation and Linkages at SGBAU, was the chief guest, while Prof. Swati Sherekar, Head of the Incubation Centre and Anand Yadav, Chief Executive Officer, were present on the dais.

Dr Ajay Lad highlighted that many innovations originate in rural areas and emphasised the need to communicate innovation in simple language.

Prof. Swati Sherekar shared insights into initiatives and activities conducted through the incubation centre. In his presidential address, Dr Wadegaonkar spoke about the department's achievements in boot camps, Avishkar competitions, and exhibitions.

The programme concluded with a vote of thanks by Amol Hirulkar and witnessed the presence of faculty members, alumni and a large number of students.

# विद्यापीठाच्या एमबीए विभागातील ३३ विद्यार्थ्यांना मिळाली नोकरी

अमरावती दि. ८ :– संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवसाय प्रशासन आणि व्यवस्थापन विभागातील ३३ विद्यार्थ्यांना डी मार्ट, आयडीएफसी फर्स्ट बँक, जिओ फायनान्शियल सरव्हसेस, इंडिया मार्ट, टी ॲन्ड एम सरव्हस कन्सल्टन्सी प्रा.लि., थानेदार ग्रुप, कॅक्टो यांसारख्या प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये एचआर एक्झिक्युटिव्ह, सेल्स एक्झिक्युटिव्ह, क्लस्टर असिस्टंट आणि सीआरएम अशा पदांवर नोकरी मिळाली आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या एम.बी.ए. विभागाचे यश सर्वत्र दिसत असून कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्यात.

सध्याच्या तणावपूर्ण आणि अनिश्चित परिस्थितीत रोजगाराच्या संधी कमी झाल्या आहेत. अशा कठीण काळात विद्यार्थ्यांसाठी नोकरी मिळवणे मोठे आव्हान बनले आहे. मात्र, या सर्व अडचणींवर मात करत विद्यापीठाच्या एमबीए विभागाने विद्यार्थ्यांचे यशस्वी प्लेसमेंट करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. प्लेसमेंट प्रक्रिया अद्याप सुरू असून येत्या काही आठवड्यांत आणखी विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध होण्याची शक्यता एमबीए विभागाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. व्ही. आर. ऑगस्टीन यांनी व्यक्त केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आठवडाभर चालणाऱ्या कार्यक्रमात ॲप्टिट्यूडटेस्ट, ट्रेनिंग, ॲडव्हॉन्स एक्सेल, मॉक इंटरव्ह्यू, ग्रुप डिस्कशन, कम्युनिकेशन स्किल्स, प्रोफेशनल रायटिंग आदींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळते. विभागाचा अभ्यासक्रम सुद्धा आधुनिक व्यवसायाच्या गरजांनुसार तयार करण्यात आला आहे. दोन वर्षांच्या या अभ्यासक्रमात फायनान्स, मार्केटिंग, ह्युमन रिसोर्सेस, ऑपरेशन्स आणि बिझनेस ॲनालिटिक्स यांसारख्या मुख्य विषयांचा समावेश आहे. तसेच इंटर्नशिप, औद्योगिक भेटी आणि अतिथी व्याख्यानांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव दिला जातो. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच विभागप्रमुख डॉ. डी. वाय. चाचरकर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

हिंदुस्थान

# विद्यापीठाच्या एम.बी.ए. विभागातील ३३ विद्यार्थ्यांना मिळाली नोकरी

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यार्थ्यांना दिल्या शुभेच्छा



अमरावती दि. ८ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवसाय प्रशासन आणि व्यवस्थापन विभागातील ३३ विद्यार्थ्यांना डी मार्ट, आयडीएफसी फर्स्ट बँक, जिओ फायनान्शियल सर्व्हसेस, इंडिया मार्ट, टी अँन्ड एम सर्व्हस कन्सल्टन्सी प्रा.लि., थानेदार ग्रुप, कॅक्टो यांसारख्या प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये एचआर एक्झिक्युटिव्ह, सेल्स एक्झिक्युटिव्ह, क्लस्टर असिस्टंट आणि सीआरएम अशा पदांवर नोकरी मिळाली आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या एम.बी.ए. विभागाचे यश सर्वत्र दिसत असून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्यात.

सध्याच्या तणावपूर्ण आणि अनिश्चित परिस्थितीत रोजगाराच्या संधी कमी झाल्या आहेत. अशा कठीण काळात विद्यार्थ्यांसाठी नोकरी मिळवणे मोठे आव्हान बनले आहे. मात्र, या सर्व अडचणींवर मात करत विद्यापीठाच्या एमबीए विभागाने विद्यार्थ्यांचे यशस्वी प्लेसमेंट करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. प्लेसमेंट प्रक्रिया अद्याप सुरू असून येत्या काही आठवडयांत आणखी विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध होण्याची शक्यता एमबीए विभागाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. व्ही. आर. ऑगस्टीन यांनी व्यक्त केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आठवडाभर चालणा-या कार्यक्रमात अँप्टिट्युडटेस्ट, ट्रेनिंग, अँडव्हॉन्स एक्सेल, मॉक इंटरव्यू, ग्रुप डिस्कशन, कम्युनिकेशन स्किल्स, प्रोफेशनल रायटिंग आदींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळते. विभागाचा अभ्यासक्रम सुध्दा आधुनिक व्यवसायाच्या गरजांनुसार तयार करण्यात आला आहे. दोन वर्षांच्या या अभ्यासक्रमात फायनान्स, मार्केटिंग, ह्युमन रिसोर्सेस, ऑपरेशन्स आणि बिझनेस अँनालिटिक्स यांसारख्या मुख्य विषयांचा समावेश आहे. तसेच इंटर्नशिप, औद्योगिक भेटी आणि अतिथी व्याख्यानांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव दिला जातो. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच विभागप्रमुख डॉ. डी. वाय. चाचरकर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

पुण्य नगरी

# शिक्षणानेच होते आत्मसन्मानाची प्राप्ती

**पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांचे प्रतिपादन**

**विद्यापीठात समता सप्ताहाचे उद्घाटन**

पुण्य नगरी / प्रतिनिधी

**अमरावती :** शिक्षण हे मुक्तीचे पहिले पाऊल आहे. केवळ पदवी मिळविणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर आपल्या आत्म्याला आणि विचारांना स्वतंत्र करणे म्हणजे खरे शिक्षण असून शिक्षणानेच आत्मसन्मानाची प्राप्ती होत असल्याचे प्रतिपादन पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्या वतीने ८ ते १४ एप्रिल या कालावधीत समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाचे उद्घाटकीय भाषण करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. आर. डी. सिकची, प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूरचे माजी कुलसचिव डॉ. पुरण मेश्राम, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. के. बी. नायक, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड आदी उपस्थित होते. प्रमुख वक्ते माजी कुलसचिव डॉ. पुरण मेश्राम यांनी 'बाबासाहेबांचे राष्ट्र उभारणीत योगदान' या विषयावर विचार मांडले. प्रमुख अतिथी डॉ. आर. डी. सिकची यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची महती सांगितली. त्यानंतर कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी आपले विचार व्यक्त केले. विद्यापीठ गीताने सुरू झालेल्या कार्यक्रमात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख, संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, मेणबत्ती प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शाल, पुस्तक व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. संतोष बनसोड, संचालन प्रा. मुक्ता तायडे, तर आभार प्रदर्शन अॅड. अरुण राऊतळे यांनी केले.




## अमरावती इव्हिनिंग

# विद्यापीठात स्टार्टअप्सना सीड फंडचे वितरण

## दोन नाविन्यपूर्ण कंपन्यांना मिळाले आर्थिक पाठबळ

### विद्यार्थ्यांनी स्टार्टअप ला करिअर म्हणून प्राधान्य द्यावे – कुलगुरू






अमरावती दि. २ :- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाउंडेशनद्वारे बुधवार दि. २ एप्रिल रोजी दोन उद्योन्मुख स्टार्टअप्सना 'सीड फंड' चे (बीज भांडवल) इन्क्युबेशन सेंटरमध्ये पार पडलेल्या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण सोसायटीच्या अर्थसहाय्याने या निधीचे वितरण करण्यात आले. डेम्स ॲन्ड हर्ब्स प्रा. लि. ला रु. २ लक्ष व कृष्णामय आयुरयोग प्रा. लि. ला रु. २.५ लक्ष सिड फंडचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, इन्क्युबेशन सेंटर प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना कुलगुरू म्हणाले, स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन देणे आवश्यक असून विद्यार्थ्यांनी स्टार्टअपला करिअर म्हणून अधिक प्राधान्य द्यावे. विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आर्थिक आणि तांत्रिक मदत पुरवली जात आहे. केंद्र आणि राज्य सरकारकडून प्राप्त होणा–या निधीचा वापर करून ज्या विद्यार्थ्यांकडे व्यावसायिक क्षमता असलेल्या नाविन्यपूर्ण कल्पना आहेत, त्यांना प्रोटोटाईप विकसित करण्यासाठी सीड फंड दिला जातो. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मोठी मदत होत आहे. भारतात सध्या स्टार्टअप्सची मोठी क्रांती होत आहे. २०१४ मध्ये देशात केवळ ५०० नोंदणीकृत स्टार्टअप्स होते, ती संख्या आज दोन लाखांच्या पुढे गेली आहे. विशेष म्हणजे यातील ५० टक्के स्टार्टअप्स हे नागपूर, अमरावती, अकोला यांसारख्या शहरांमधून आलेले आहेत. त्याहूनही अभिमानाची बाब म्हणजे, एकूण स्टार्टअप्सपैकी ४८ टक्के व्यवसायांमध्ये किमान एक महिला संस्थापक किंवा संचालिका आहे. महिला सक्षमीकरणाचे हे एक उत्तम उदाहरण असल्याचेही कुलगुरू म्हणाले.

विद्यार्थ्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहून पैसे कमवण्यासोबतच समाजातील प्रश्न सोडवून इतरांनाही रोजगार उपलब्ध करून देण्याचे समाधान स्टार्टअप्सच्या माध्यमातून मिळू शकते, असा विश्वासही कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी यावेळी व्यक्त केला. इन्क्युबेशन सेंटर प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर यांनी सेंटरमधील उपक्रमांबाबत माहिती दिली. सूत्रसंचालन व आभार सेंटरचे व्यवस्थापक श्री अमोल हिरुळकर यांनी मानले. कार्यक्रमाला शासकीय तंत्रनिकेतनमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नरेश मोवळे, रवी ढेंगळे, भावेश वारके यांनी अथक परिश्रम घेतले.



लोकशाही वार्ता

# समता सप्ताहनिमित्त आयोजित समता दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद

## महापुरुषांच्या विचारांची प्रेरणा विद्यार्थ्यांनी घ्यावी - प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे



लोकशाही वार्ता/अमरावती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने समता सप्ताहनिमित्ताने आयोजित समता दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यापीठाचे अधिकारी, प्राचार्य, शिक्षक, कर्मचा-यांसह विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठज प्रमाणात सहभाग घेतला.सर्वप्रथम डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पुतळ्याला प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी पुष्पार्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख पुतळा, पंचवटी चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दरम्यान ही ह्यसमता दौडह्न काढण्यात आली. समता दौडचे हिरवी झेंडी दाखवून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एच.आर. देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, डॉ. तनुजा राऊत, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत, प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. व्ही.जी. ठाकरे, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, डॉ. पंजाबराव देशमुख नियमन केंद्र समन्वयक डॉ. महेंद्र मेटे, डॉ. गजानन मुळे, आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड, डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे तसेच विविध प्राधिकारिणींचे आजी व माजी सदस्य यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

पंचवटी चौक येथून निघालेल्या समता दौडने श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महा वद्यालय येथे व त्यानंतर कला व वाणिज्य महाविद्यालय येथे सुध्दा महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. इर्विन चौक येथे या समता दौडचे समापन झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला सर्व मान्यवरांनी अभिवादन केले. यावेळी मार्गदर्शन करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि शिक्षण महर्षि डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी देशाच्या उभारणीमध्ये फार मोठे योगदान दिले असून त्यांच्या विचाराची सर्वांनी प्रेरणा घ्यावी आणि मार्गक्रमण करावे. संत गाडगे बाबांचे विचार विविध उपक्रमाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य आपले विद्यापीठ नेहमी करीत राहिले आहे व समता सप्ताह निमित्ताने होणा-या सर्व कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले. यावेळी विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठज संख्येने उपस्थित होते.

आपली मातृभूमि

## समता सप्ताह निमित्त आयोजित 'समता दौड' ला उत्स्फूर्त प्रतिसाद

# महापुरुषांच्या विचारांची प्रेरणा विद्यार्थ्यांनी घ्यावी

### प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचे प्रतिपादन

आमचा प्रतिनिधी/९ एप्रिल

अमरावती- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने समता सप्ताहनिमित्ताने आयोजित समता दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यापीठाचे अधिकारी, प्राचार्य, शिक्षक, कर्मचा-यांसह विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.





सर्वप्रथम डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पुतळ्याला प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी पुष्पार्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख पुतळा, पंचवटी चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दरम्यान ही 'समता दौड' काढण्यात आली. समता दौडचे हिरवी झेंडी दाखवून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एच.आर. देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, डॉ. तनुजा राऊत, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत, प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. व्ही.जी. ठाकरे, उपकुलसचिव श्री मनीष वाठोडे, डॉ. पंजाबराव देशमुख नियमन केंद्र समन्वयक डॉ. महेंद्र मेटे, डॉ. गजानन मुळे, आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता घोगरे, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड, डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे तसेच विविध प्राधिकारिणींचे आजी व माजी सदस्य यांची प्रमुखाने उपस्थिती होती. पंचवटी चौक येथून निघालेल्या समता दौडने श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे व त्यानंतर कला व वाणिज्य महाविद्यालय येथे सुध्दा महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. इर्विन चौक येथे या समता दौडचे समापन झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला सर्व मान्यवरांनी अभिवादन केले. यावेळी मार्गदर्शन करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि शिक्षण महर्षि डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी देशाच्या उभारणीमध्ये फार मोठे योगदान दिले असून त्यांच्या विचाराची सर्वांनी प्रेरणा घ्यावी आणि मार्गक्रमण करावे. यावेळी विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक दिव्य मराठी

# समता सप्ताहनिमित्त आयोजित समता दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद

### प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी दाखवली हिरवी झेंडी : विविध मान्यवरांची होती उपस्थिती

प्रतिनिधी | अमरावती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने समता सप्ताहनिमित्ताने आयोजित समता दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यापीठाचे अधिकारी, प्राचार्य, शिक्षक, कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी सहभाग घेतला होता.



समता दौडमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.

सर्वप्रथम डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पुतळ्याला प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी पुष्पार्पण करून अभिवादन केले. त्यानंतर डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख पुतळा, पंचवटी चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दरम्यान ही 'समता दौड' काढण्यात आली. हिरवी झेंडी दाखवून समता दौडचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एच.आर. देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत, शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. व्ही.जी. ठाकरे, उपकुलसचिव मनीष वाठोडे, डॉ. पंजाबराव देशमुख नियमन केंद्र समन्वयक डॉ. महेंद्र मेटे, डॉ. गजानन मुळे, आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता घोगरे, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड, डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे तसेच विविध प्राधिकारिणींचे आजी व माजी सदस्य यांची प्रमुखाने उपस्थिती होती.

**महापुरुषांच्या विचारांची प्रेरणा विद्यार्थ्यांनी घ्यावी**

पंचवटी चौक येथून निघालेल्या समता दौडने श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे व त्यानंतर कला व वाणिज्य महाविद्यालय येथेही महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. इर्विन चौक येथे या समता दौडचे समापन झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला सर्व मान्यवरांनी अभिवादन केले. यावेळी मार्गदर्शन करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी देशाच्या उभारणीमध्ये फार मोठे योगदान दिले असून त्यांच्या विचाराची सर्वांनी प्रेरणा घ्यावी आणि मार्गक्रमण करावे. संत गाडगे बाबांचे विचार विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य आपले विद्यापीठ नेहमी करीत राहिले आहे व समता सप्ताह निमित्ताने होणाऱ्या सर्व कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. यावेळी विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने समता सप्ताहनिमित्ताने आयोजित समता दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यापीठाचे अधिकारी, प्राचार्य, शिक्षक, कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी सहभाग घेतला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.

आपली मातृभूमि

# अमरावती विद्यापीठात पाली व बुद्धधम्म विचारांचा जागर

## माजी विद्यार्थ्यांना भावपूर्ण निरोप



आमा प्रतिनिधी/१० एप्रिल

अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या पाली आणि बुद्धधम्म विभागाचा वार्षिक स्नेहसंमेलन व निरोप समारंभ नुकताच अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रबोधनात्मक वातावरणात संपन्न झाला. विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्तुळात या सोहळ्याने आपली एक वेगळी छाप पाडली असून, समता, मैत्री आणि स्नेहाचा त्रिवेणी संगम याप्रसंगी पाहायला मिळाला.


मान्यवरांची उपस्थिती आणि मार्गदर्शन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागाच्या समन्वयक डॉ. रेखा बानखडे (पर्वतकर) होत्या. सोहळ्याचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या हस्ते पार पडले. प्रमुख अतिथी म्हणून परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे आणि सिनेट सदस्य डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते. प्रा. टी. बी. रामटेके यांनी प्रास्ताविकातून विभागाच्या शैक्षणिक प्रगतीचा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा मांडला. ह्रदयस्पर्शी प्रबोधन आणि भावुक क्षण विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांच्या जोरावर केवळ मनोरंजन न करता, गीत, गझल आणि नाटिकांच्या माध्यमातून सामाजिक समतेचा संदेश दिला.

एम.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी वैशाली कोटांगळे आणि ट्रॉफी मोहोड यांच्या ओघवत्या सूत्रसंचालनाने कार्यक्रमात रंगत आणली. त्यानंतर, एम.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ आणि पुस्तक देऊन सन्मानपूर्वक निरोप देण्यात आला. यावेळी गुरुजनांचे मार्गदर्शन आणि मित्रांच्या आठवणींना उजाळा देताना अनेक विद्यार्थी भावुक झाले होते. ह्पाली भाषा भवनासाठी ऐतिहासिक पुढाकार या सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे 'पाली भाषा भवन' निर्मितीसाठी विद्यार्थ्यांनी एकवटून दिलेला लढा. प्राचीन पाली भाषेला हक्काची जागा मिळावी, या मागणीचे विशेष निवेदन कुलसचिवांमार्फत कुलगुरूंना सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या कृतिशील पुढाकाराने प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले आहे. ह्कार्यक्रमासाठी परिश्रम हा सोहळा यशस्वी करण्यासाठी ह. सुधीर पाटील, अशोक भोरे, बाबूलाल शिरसाट, भिक्खू सीलवंसालंकार आणि अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. व्ही. रोकडे यांच्यासह एम.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. दात्यांच्या आर्थिक सहकार्यातून आयोजित स्नेहभोजनाने कार्यक्रमाची गोडी वाढवली. शेवटी, सर्वांच्या सुख-शांतीसाठी मंगल कामना व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

पुण्यनगरी

# पदव्युत्तर प्राणिशास्त्र विभागातील विद्यार्थिनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत





अमरावती : विद्यापीठातील पदव्युत्तर प्राणिशास्त्र विभागातील स्रिया विलास चव्हाण व दिया विलास चव्हाण या जुळ्या भगिनींनी अनुक्रमे ८.८६ आणि ८.८० पॉइंट घेऊन विद्यापीठाच्या उन्हाळीमध्ये घेण्यात आलेल्या एस.एस्सी. भाग-२ प्राणिशास्त्र परीक्षेत उत्तीर्ण होऊन गुणवत्ता यादीत अनुक्रमे पाचव्या आणि सहाव्या क्रमांकाने येण्याचा मान मिळविला आहे. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विभाग प्रमुख डॉ. हेमलता नांदूरकर तसेच शिक्षक विनोद नागले, डॉ. शितल काळे, डॉ. रजनी तायडे, अंकिता पानसरे, अर्पित इंगळे, संपदा जोशी, रचना घुरे, विनय झटाले यांनी स्वागत केले आहे.

# Massive response to *Samata Daud* in Amravati





SGBAU Registrar Dr Avinash Asnare and others taking part in the Samata Daud.

■ **Amravati Bureau**
AMRAVATI, Apr 11

SAMATA daud organised by the Dr Ambedkar Study Centre of Sant Gadge Baba Amravati University as part of the Samata Saptah celebrations, received an overwhelming response, with large participation from university officials, principals, teachers, staff and students.

The programme began with floral tributes paid to Dr Panjabrao alias Bhausaheb Deshmukh by Dr Mahendra Dhore, Pro-Vice-Chancellor. The Samata Daud was then flagged off by Dr Dhore, covering the route from Panchvati Square to Dr Babasaheb Ambedkar Chowk.

Dr Avinash Asnare, Registrar, Dr H R Deshmukh, Dean of Science and Technology, Dr Nitin Koli, Director of Examination and Evaluation, Pushkar Deshpande, Finance and Accounts Officer, Dr Tanuja Raut, Dr Subhash Gawande, Principal, Shashikant Rode, Executive Engineer, Dr V G Thakare, Secretary of Shri Shivaji Education Society, Mangesh Varkhede, Deputy Registrar, Dr Mahendra Mete, Coordinator, Dr Gajanan Mule, Dr Smita Thorat, Health Officer, Dr Santosh Bansode, Coordinator of Dr Ambedkar Study Centre and Dr Ratnashil Khobragade, along with several former and current members of university authorities.

The run commenced from Panchwati Chowk and proceeded to Shri Shivaji College of Physical Education and later to the Arts and Commerce College, where tributes were paid to great leaders. The event concluded at Irwin Chowk, where dignitaries paid homage to Dr B R Ambedkar.

Addressing the gathering, Dr Mahendra Dhore highlighted the immense contributions of Dr B R Ambedkar, Jyotiba Phule and Dr Panjabrao Deshmukh in nation building. He urged students to draw inspiration from their thoughts and ideals. He also emphasised that the university has consistently worked to spread the teachings of Sant Gadge Baba through various initiatives and encouraged students to actively participate in programmes organised during Samata Saptah. A large number of university officials, teachers and students were present.

आपली मातृभूमि

# डॉ.भाऊसाहेब देशमुख यांच्या विचार व कार्यातच सामाजिक समता

## ✲ डॉ.स्वप्निल अरसड यांचे प्रतिपादन ✲ विद्यापीठात सामाजिक सप्ताहनिमित्त व्याख्यान



आमा प्रतिनिधी/११ एप्रिल

अमरावती : डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांनी आपले संपूर्ण आयुष्य सामाजिक समतेचा विचार रुजवण्यासाठी आणि दीन-दलितांच्या उत्थानासाठी समर्पित केले. त्यांच्या प्रत्येक कृतीतून आणि विचारातून समतेचा संदेश जनमानसात पोहोचला, असे प्रतिपादन श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. स्वप्नील अरसड यांनी केले. निमित्त होते, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्रातर्फे आयोजित 'समता सप्ताह' कार्यक्रमाचे. भाऊसाहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित या विशेष व्याख्यानात त्यांनी भाऊसाहेबांच्या जीवनकार्याचा वेध घेतला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे होते. व्यासपीठावर प्रा. प्रफुल्ल कडू, डॉ. महेंद्र मेटे, अजय देशमुख आणि डॉ. संतोष बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. अरसड पुढे म्हणाले की, जगातील बळीराजाला संघटित करण्यासाठी भाऊसाहेबांनी शेतकरी संघाची मुहूर्तमेढ रोवली. ग्रामीण भागातील मुलांनी शिकावे आणि मोठे व्हावे, या तळमळीतून त्यांनी श्रद्धानंद वसतिगृह उभारले. एवढेच नव्हे तर, श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. अंबादेवी मंदिर सत्याग्रह असो वा सार्वजनिक विहिरी सर्वांसाठी खुल्या करणे, भाऊसाहेबांनी समतेसाठी प्रत्यक्ष मैदानात उतरून संघर्ष केला. अध्यक्षीय भाषणात डॉ. महेंद्र ढोरे यांनी भाऊसाहेबांनी स्वतः आंतरजातीय विवाह करून समाजासमोर समतेचा वस्तुपाठ ठेवल्याचे सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने आणि महापुरुषांच्या प्रतिमा पूजनाने झाली. याप्रसंगी डॉ. स्वप्नील अरसड यांच्या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले. कार्यक्रमाला डॉ. वैशाली गुडधे, डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. निलेश कडू, डॉ. नितीन सिरके, डॉ. अनिता पाटील, डॉ. प्रेमानंद शिंदे यांच्यासह शहरातील नागरिक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते. प्रास्ताविक डॉ. महेंद्र मेटे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. संतोष बनसोडे यांनी तर आभार डॉ. विलास नांदुरकर यांनी मानले.

पुण्य नगरी

अंबानगरीशी विशेष ऋणानुबंध

# आशा भोसले यांना मिळाली होती अमरावती विद्यापीठाची 'डी.लिट.'




। अमरावती : ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे रविवारी निधन झाले. त्यामुळे राज्यभरात त्यांच्या चाहत्यांकडून आदरांजली अर्पण केली जात आहे. आशा भोसले व त्यांचे वडील दीनानाथ मंगेशकर यांचा अंबानगरीशीही विशेष ऋणानुबंध होता. विशेष म्हणजे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने त्यांना 'डी.लिट.' पदवी देऊन सन्मानित केले होते.

अमरावती विद्यापीठाची १९८३ मध्ये स्थापना झाल्यानंतर चौथ्याच वर्षी म्हणजे १९८७ मधील तृतीय दीक्षान्त समारंभात गायिका आशा भोसले यांना डी.लिट. पदवी प्रदान करण्यात आली होती. विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. के. जी. देशमुख यांच्या हस्ते त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली होती. आशा भोसले यांचे वडील दीनानाथ मंगेशकर यांना सुरुवातीच्या काळात अंबानगरीतील प्रेक्षकांनी भरभरून साथ दिली होती. त्याबद्दलही आशा भोसले यांनी अमरावतीवासीयांप्रती कृतज्ञता व्यक्त केली होती. दरम्यान, विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी रविवारी आशा भोसले यांना आदरांजली अर्पण केली.

दैनिक भास्कर

# डॉ.देशमुख के विचारों में सामाजिक समता समाहित

## ▪ समता सप्ताह व्याख्यान में डॉ. स्वप्निल अरसड ने कहा




अमरावती | डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख के विचारों और कार्यों में सामाजिक समता गहराई से समाहित थी और उन्होंने जीवनभर इसके लिए कार्य किया। इस आशय का प्रतिपादन श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती के भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. स्वप्निल अरसड ने किया। संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के डॉ. आंबेडकर अध्ययन केंद्र द्वारा आयोजित समता सप्ताह समारोह-2026 के अंतर्गत 10 अप्रैल को "डॉ. पंजाबराव देशमुख का सामाजिक समता का विचार और कार्य" विषय पर आयोजित व्याख्यान में वे बोल रहे थे। उन्होंने बताया कि डॉ. देशमुख ने किसानों के संगठन, शिक्षा प्रसार, वसतिगृह स्थापना, सामाजिक सुधार आंदोलनों तथा कृषि क्षेत्र के विकास के लिए महत्वपूर्ण कार्य किए। उन्होंने गरीबों के बच्चों के लिए शिक्षा के द्वार खोले और सामाजिक समता के लिए अनेक आंदोलन चलाए।

कार्यक्रम की अध्यक्षता प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे ने की। इस अवसर पर प्रा. प्रफुल्ल कडू, डॉ. महेंद्र मेटे, अजय देशमुख, डॉ. संतोष बनसोड सहित कई मान्यवर उपस्थित थे।

अध्यक्षीय भाषण में डॉ. ढोरे ने कहा कि डॉ. देशमुख ने स्वयं अंतरजातीय विवाह कर समता का संदेश दिया और उनके कार्यों से प्रेरणा लेना ही सच्ची श्रद्धांजलि होगी।

कार्यक्रम की शुरुआत महापुरुषों के चित्र पूजन से हुई तथा अंत में आभार प्रदर्शन किया गया। बड़ी संख्या में शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी एवं नागरिक उपस्थित रहे।

# महापुरुषों के विचारों से प्रेरणा लें : डॉ. ढोरे

▪ समता दौड़ के आयोजन पर रखे विचार
▪ एक साथ दौड़े हजारों विद्यार्थी और अधिकारी








भास्कर डेस्क | अमरावती

संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के डॉ. आंबेडकर अध्ययन केंद्र द्वारा समता सप्ताह के उपलक्ष्य में आयोजित 'समता दौड़' को विद्यार्थियों और शिक्षकों का उत्स्फूर्त प्रतिसाद मिला। दौड़ में विश्वविद्यालय के अधिकारी, प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी तथा बड़ी संख्या में छात्र-छात्राओं ने भाग लिया। कार्यक्रम की शुरुआत डॉ. पंजाबराव देशमुख की प्रतिमा पर प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे द्वारा पुष्पांजलि अर्पित कर की गई। इसके बाद पंचवटी चौक से डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक तक 'समता दौड़' निकाली गई, जिसका शुभारंभ डॉ. महेंद्र ढोरे ने हरी झंडी दिखाकर किया। इस अवसर पर कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, अधिष्ठाता डॉ. एस.आर. देशमुख, परीक्षा संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त अधिकारी सीए पुष्कर देशपांडे सहित कई गणमान्य उपस्थित रहे। दौड़ पंचवटी चौक से शुरू होकर विभिन्न मार्गों से होती हुई इर्विन चौक पर सम्पन्न हुई। मार्ग में श्री शिवाजी शारीरिक शिक्षा महाविद्यालय सहित अन्य स्थानों पर महापुरुषों को श्रद्धांजलि अर्पित की गई। अंत में डॉ. बाबासाहेब आंबेडकर की प्रतिमा पर अभिवादन कर कार्यक्रम का समापन हुआ। डॉ. महेंद्र ढोरे ने कहा कि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले और डॉ. पंजाबराव देशमुख जैसे महापुरुषों ने देश निर्माण में महत्वपूर्ण योगदान दिया है। विद्यार्थियों को उनके विचारों से प्रेरणा लेकर आगे बढ़ना चाहिए।

आपली मातृभूमि

## अमरावती विद्यापीठात पाली व बुद्धिझम विभागाचा स्नेहसंमेलन व निरोप समारंभ उत्साहात



नवभारत

## विवि में 'समता सप्ताह' का समापन

### डॉ. आंबेडकर जयंती पर आयोजन



समाज में समानता का संदेश

The Hitavada

## SGBAU holds rally, programmes on Ambedkar *Jayanti*

■ Amravati Bureau
AMRAVATI, Apr 14

SANT Gadge Baba Amravati University organised a grand rally and a series of social initiatives to mark the 135th birth anniversary of Dr Babasaheb Ambedkar, recently.

The rally commenced from the Constitution Sculpture on the university campus and proceeded to Dr Babasaheb Ambedkar Square. A large cutout of Dr Ambedkar was displayed during the procession, which was flagged off in the presence of Dr Milind Barhate, Vice-Chancellor of Sant Gadgebaba Amravati University, Dr Mahendra Dhore, Pro-Vice-Chancellor and Dr Avinash Asnare, Registrar.

The rally marked the conclusion of the university's week-long 'Samata Saptah' held from April 8 to April 14. Various educational and awareness programmes were conducted throughout the week to promote the message of equality.

Earlier in the day, Dr Milind Barhate paid floral tribute to Dr Babasaheb Ambedkar's portrait at the university. Later, at Dr Ambedkar Square, he also garlanded the statue of the leader on behalf of the university.

On this occasion, the Dr Ambedkar Study Centre of the university set up a stall distributing copies of the Preamble of the Indian Constitution, along with earthen pots symbolising the humanitarian message of Sant Gadge Baba.

In another initiative, the Backward Class Employees Association of the university donated educational resources to support students preparing for competitive exams. A steel cupboard was provided to a library run by the Buddhist Dhamma Prachar Committee at Bhim Tekdi, while books worth Rs 15,500 were donated to Shenoshi Study Centre in Balgaon and books worth Rs 26,800 to Gyanpratik Dr Babasaheb Ambedkar Study Centre in Tapovan.



Dr Milind Barhate and others offering obeisance to Dr Babasaheb Ambedkar.

Speaking on the occasion, Dr Milind Barhate stated that the week long activities aimed to spread the message of equality across the city, state and especially among students. He urged students to carry forward Dr Babasaheb Ambedkar's thoughts and actively work towards social equality.

The programme witnessed enthusiastic participation from university officers, faculty members, staff and students. Several dignitaries, including Dr Pravin Raghuvanshi, Management Council Member of the university, Dr Manisha Kodape, Management Council member, Dr Nitin Koli, Director of Board of Examination and Evaluation, Pushkar Deshpande, Finance and Account Officer, Dr Ajay Lad, Dr Nilesh Kadu, Dr Santosh Bansod, Dr Smita Thorat, Dr Premanant Tidke, Dr Gajanan Mule and many other members of the university management council, department heads and administrative officers, were present and contributed to the success of the event.



Students and others participated in the rally.



Dr Milind Barhate, Dr Pravin Raghuvanshi and others distributing books.

आपली मातृभूमि

## विद्यापीठात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना १३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन

### 'समता सप्ताह' उत्साहात





वृत्त केसरी

संशोधन मार्गदर्शक अभिमुखता कार्यशाळेत गुणवत्तेवर भर

# विद्यार्थ्यांनी देशहित डोळ्यासमोर ठेवून संशोधन, गुणवत्ता वाढवावी

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे आवाहन





प्रतिनिधी/ वृत्त केसरी

अमरावती, १९ एप्रिल: विद्यार्थ्यांनी देशहित डोळ्यासमोर ठेवून संशोधन व गुणवत्ता वाढवावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता हमी कक्ष व अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ, अमरावती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संशोधन मार्गदर्शक अभिमुखता : नियमावली, दिशा आणि संशोधन गुणवत्ता कार्यशाळेत अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते.

व्यासपीठावर उद्घाटक म्हणून अ.भा. शैक्षिक महासंघाच्या विभागीय अध्यक्ष डॉ. मीनल भोंडे, बीजभाषक म्हणून सिम्बायोसिस सेंटर फॉर मेडिकल इमेजिंग, पुणे येथील डॉ. भूषण बोरोटीकर, आय.क्यू.ए.सी. चे संचालक डॉ. संदीप वाघुळे, विद्यापीठ विद्या परिषद सदस्य डॉ. हेमंत चांडक, अ.भा. शैक्षिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. ओमप्रकाश मुंदे उपस्थित होते. डॉ. मीनल भोंडे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.

डॉ. भूषण बोरोटीकर यांनी संशोधनातील गुणवत्ता, प्रामाणिकता, प्लॅजिअरिझम नियंत्रण तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन निकष याबर मार्गदर्शन केले. डॉ. मीनल भोंडे यांनी संशोधन संस्कृती अधिक सक्षम करण्यासाठी मार्गदर्शकांची तसेच संशोधकांची जबाबदारी अधोरेखित करत शैक्षिक महासंघ शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता व पारदर्शकता अधिक प्रभावी व्हावी आणि संशोधन व्यावसायाभिमुख आणि समाजाभिमुख व्हावे, याकरिता सर्व मार्गदर्शकांनी जातीने लक्ष द्यावे, असे आवाहन केले.

दुपारच्या सत्रात डॉ. हेमंत चांडक यांनी संशोधन पध्दती, संशोधन प्रस्ताव लेखन आणि विश्लेषण, तसेच यूजीसी 2022 च्या नियमावलीवर आधारित संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे 41/20225 याबर सविस्तर विवेचन करतांना संशोधक, मार्गदर्शक, समन्वयक आणि प्राचार्य यांचा सहभाग आणि पीएचडी संदर्भातले कागदपत्रे सादर करतांना संशोधक विद्यार्थ्यांना येणा-या अडचणी आणि त्यावरील उपाययोजना याबाबत त्यांनी उपयुक्त मार्गदर्शन केले. सत्राच्या अध्यक्षस्थानी माताेश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती येथील प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख होत्या. संशोधक आणि मार्गदर्शक नियमावलीचा अभ्यास करून संशोधन आणि कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी यावेळी माहिती दिली.

पॅनेल चर्चेदरम्यान संशोधन गुणवत्ता, मार्गदर्शक - विद्यार्थी संबंध, प्रकाशन प्रक्रिया व संशोधनातील नैतिकता याबर चर्चा झाली. समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. मीनल भोंडे, प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, उपकुलसचिव डॉ. मीनल मालधुरे उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. मंगेश अडगोकार यांनी केले. डॉ. संदीप वाघुळे यांनी आय.क्यू.ए.सी. ची भूमिका विषद केली. सूत्रसंचालन डॉ. वि. रा. मांडवकर यांनी, तर आभार डॉ. ओमप्रकाश मुंदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या सर्व अध्यक्ष, महामंत्री, महिला प्रमुख, सहप्रमुख तसेच अभ्यास मंडळ अध्यक्ष, पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यशाळेला विविध विद्याशाखांमधील संशोधन मार्गदर्शक प्राध्यापक, पीएच.डी. संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

जनमाध्यम

# विद्यार्थ्यांनी देशहित डोळ्यासमोर ठेवून संशोधन करावे: कुलगुरू

## विद्यापीठात संशोधन मार्गदर्शक अभिमुखता कार्यशाळेत गुणवत्तेवर भर




**The Hitavada**

# 2-act play 'Jyotibachi Sawli, Savitri Mauli' receives massive response in Amravati

■ Amravati Bureau
AMRAVATI, Apr 17

'JYOTIBACHI Sawli, Savitri Mauli', a two-act play received an enthusiastic response during the Samata Saptah Samaroh 2026, organised by the Dr Ambedkar Study Centre at Sant Gadge Baba Amravati University, recently. The play, performed by Apurva Sonar and fellow artists, portrayed the journey of social equality beginning with women's education.



Artists presenting 'Jyotibachi Sawli, Savitri Mauli' play.

Through powerful performances, the artists highlighted the contributions and struggles associated with the movement for social reform. The event was attended by several dignitaries, including Dr Nitin Koli, Director of Board of Examination and Evaluation of Sant Gadgebaba Amravati University, Dr Bhaiyyasaheb Metkar, member of the University Management Council, Dr Sandeep Waghule and Dr Santosh Bansod, Coordinator of the Dr Ambedkar Study Centre.


While addressing the audience, Dr Sandeep Waghule elaborated on the contributions of Mahatma Jyotiba Phule towards the upliftment of marginalised communities. Dr Nitin Koli spoke about the struggles Phule faced while challenging the social conditions of his time. Speakers also recalled the historic Mahad Satyagraha led by Dr B R Ambedkar for equal access to water, and highlighted the establishment of the Satyashodhak Samaj to promote social justice and equality. Dr Bhaiyyasaheb Metkar emphasised the immense contribution of Savitribai Phule and Mahatma Phule in advancing women's education, stating that their sacrifices laid the foundation for an educated society today. He also cited role models such as Jijau, Savitribai Phule, and Ramabai.

On the occasion, the second edition of the book 'Jyotibachi Sawli, Savitri Mauli' was released by the dignitaries. The artists, including Apurva Sonar, Jaykumar Charjan, Shila Charjan, Sachin Karde, Anuradha Bhuskate, Vrunda Tadas, Monika Mehre and Shital Madghe, were felicitated with books.

The programme began with floral tributes, lighting of lamps, and the university anthem. Dr Santosh Bansod conducted the proceeding of the programme. Several academicians, coordinators from various departments and citizens, including students and faculty members from Amravati, were present.

**दैनिक दिव्य मराठी**


## विद्यापीठात महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम



अमरावती | संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला उपकुलसचिव (विकास) डॉ. सुलभा पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व महात्मा बसवेश्वर यांच्याबद्दलची माहिती विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

**जनमाध्यम**

**संक्षिप्त**



## विद्यापीठात महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

**अमरावती**-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला उपकुलसचिव (विकास) डॉ. सुलभा पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व महात्मा बसवेश्वर यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

हिंदुस्थान

# विद्यापीठात स्टार्ट अप्सना सीड फंडचे वितरण

## पाच नाविन्यपूर्ण कंपन्यांना आर्थिक पाठबळ




अमरावती दि. २१ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाउंडेशन मार्फत पाच उदयोन्मुख स्टार्टअप्सना 'सीड फंड' चे (बीज भांडवल) वितरीत करण्यात आले. हा निधी वितरण सोहळा नुकताच विद्यापीठ परिसरातील इन्क्युबेशन सेंटरमध्ये पार पडला. स्टार्टअप इंडिया सिड फंड स्किम अंतर्गत या स्टार्टअप्सना आर्थिक सहाय्य देण्यात आले. त्यामध्ये श्री मोरया ॲग्रो रिसर्च नॅनो बायोटेक ८ लाख, एसजेडी श्रीजी ब्रादर्स प्रा. लि. ६ लाख, वेनो टेक्नॉलॉजीज प्रा. लि. १० लाख, पवन ई-पॉवर सोल्यूशन्स टेक्नॉलॉजी प्रा. लि. १० लाख आणि इनशीराह हर्बल्स प्रा. लि. ४ लाख असे निधीचे वितरण विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी स्टार्टअप्सच्या नाविन्यपूर्ण संकल्पना जाणून घेतल्या तसेच उद्योजकांना मार्गदर्शनही केले.

भारत सरकारच्या स्टार्टअप इंडिया सिड फंड स्किमच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण कल्पनांना चालना देण्यासाठी हा निधी प्रदान केला जातो. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे इन्क्युबेशन सेंटर विभागातील स्टार्टअप्सना तांत्रिक मार्गदर्शन, पायाभूत सुविधा आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देत सक्षम स्टार्टअप इकोसिस्टम उभारण्यात महत्वाची भूमिका बजावत आहे. सदर स्टार्टअप्सना आर्थिक पाठबळ मिळवून देण्यासाठी विद्यापीठाच्या रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाउंडेशनच्यावतीने अथक परिश्रम घेण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर, संचालक व सीईओ श्री आनंद यादव तसेच मॅनेजर श्री अमोल हिरुळकर, नरेश मोवाळे, रवी ढेंगळे आणि भावेश वारके यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

विदर्भ मतदार

# शैक्षणिक वातावरण निर्मितीद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होईल

## कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते यांचे प्रतिपादन

'करिअर कट्टा' अंतर्गत विभागीय कार्यशाळा



हिंदुस्थान

# विद्यापीठातील प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये १५ विद्यार्थ्यांची निवड

## विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविणे हेच विद्यापीठाचे प्रथम ध्येय : डॉ. अजय लाड



अमरावती दि. २४ : विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविणे हेच विद्यापीठाचे प्रथम ध्येय आहे, असे प्रतिपादन नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभाग आणि एसएए टेक्नॉलॉजी (सावरियासेठ ऑटो अॅन्ड अॅग्रो टेक्नॉलॉजी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्लेसमेंट ड्राईव्ह कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील, यजुस बायोटेक प्रा. लि. पुणे चे श्री सुधीर लड्डा, सावरियासेठ ऑटो अॅन्ड अॅग्रो टेक्नॉलॉजी अकोलाच्या व्यवस्थापकीय संचालक रिध्दी लड्डा उपस्थित होते.

डॉ. लाड पुढे म्हणाले, तळागाळातील तरुण जेव्हा चांगल्या प्रकारे शिकतील, तेव्हाच एक चांगली कंपनी तयार होऊ शकते आणि त्यासाठी विद्यापीठाच्यावतीने वेळोवेळी आयोजित होणा-या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

रिध्दी लड्डा म्हणाल्या म्हणाल्या, अमरावती शहरातील विद्यार्थ्यांमध्ये अफाट टॅलेंट असून या तरुणाईसोबत काम करण्यासाठी मी अतिशय उत्सुक आहे. सावरिया सेठ' व सर्वांच्या शुभेच्छा घेऊनच त्यांनी या प्रकल्पाची सुरुवात केली आहे. त्यांच्या कंपनीला भविष्यात मोठी उंची गाठायची असून, त्यासाठी त्यांना स्वतःहून पुढाकार घेणारे, कामाप्रती पूर्णपणे समर्पित असणारे, तसेच नवनवीन गोष्टी शिकण्याची कठोर मेहनत करण्याची तयारी असणा-या तरुणांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. प्लँट टिश्यू कल्चर लॅब संबंधित या प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभाग, वनस्पतीशास्त्र विभाग, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग तसेच विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रत्यक्ष मुलाखतीनंतर १५ विद्यार्थी शॉर्टलिस्ट झाले आहे. पुढच्या राऊंडनंतर त्यांची अंतिम निवड होणार आहे. प्रास्ताविक डॉ. अनिता पाटील, सूत्रसंचालन डॉ. प्रशांत ठाकरे, तर आभार डॉ. सुदर्शन कोवे यांनी मानले.

# Prizes of elocution competition given away



Dignitaries with winning students at SGBAU.

**Amravati Bureau**
AMRAVATI, Apr 28

THE Women's Studies Centre of Sant Gadge Baba Amravati University (SGBAU) had recently organised an elocution competition on the topic 'Cyber Crimes Against Women: Nature and Remedies'. The competition was organised for students from various academic departments of the University.

Objective of the competition was to create awareness among students about cyber crimes against women and to encourage them to think and work towards practical and preventive solutions. Students from different departments participated actively and presented their views with relevant references related to the topic.

Based on the presentations, first, second, third prizes and two consolation prizes were awarded. In the competition, Pallavi Chimurkar from the MA Gender and Women's Studies programme secured the first prize while Gayatri Talekar won the second prize and Prafulla Kukde secured the third prize. Prajkta Deshmukh received a consolation prize, while Jay Kale from the Department of Education also won a consolation prize.

The competition was judged by noted political science scholar Dr Sapna Ronghe. The prize-winning students were felicitated with book sets at the hands of Dr Vaishali Gudhe, Director of the Women's Studies Centre.

Dr Sapna Ronghe and Prof. Dr Bhagwan Phalke were present on the dais.

Dr Vaishali Guddhe expressed concern over the rapidly increasing number of cyber crimes in society, calling it a serious issue. She highlighted that the Women's Studies Centre has earlier conducted programmes on digital literacy among women and cyber security awareness among college girls. She emphasised that cyber security is a highly sensitive issue for women and appealed to students to spread greater awareness in their surroundings.

Prof Pooja Alone anchored and the programme andlaos proposed a vote of thanks.

लोकमत



## विद्यापीठात विभागीय कार्यशाळा विद्यार्थ्यांना 'करिअर कट्टा'चे बळ

### कुलगुरूंच्या हस्ते उद्घाटन; नावीन्यपूर्ण संकल्पनांवर झाले मंथन

लोकमत न्यूज नेटवर्क

अमरावती : महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्यातर्फे राज्यातील महाविद्यालयांमध्ये 'करिअर कट्टा' उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या जागृतीसाठी आयोजित अमरावती विभागाची एकदिवसीय विभागीय कार्यशाळा पार पडली.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले. अध्यक्षस्थानी तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे होते. विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, डॉ. धनंजय तळवणकर, अमरावती विभागीय प्राचार्य प्रवर्तक, विभागीय समन्वयक डॉ. दिनेश खेडकर आणि डॉ. रंजना जीवने यांची प्रमुख उपस्थिती होती. समारोपीय सत्रात प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे अध्यक्षस्थानी होते.

### कौशल्य विकासासाठी 'कट्टा' ठरणार प्रभावी

उद्घाटनपर भाषणात कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते म्हणाले की, 'करिअर कट्ट्याच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, उद्योग आणि नवकल्पना करिअर संदर्भी माहिती एकाच छताखाली मिळणार आहे. यशवंत शितोळे यांनी अध्यक्षीय भाषणातून या उपक्रमाची व्याप्ती आणि भविष्यातील नावीन्यपूर्ण संकल्पनांवर प्रकाश टाकला.

### 'एआय आणि एमओयू'

मार्गदर्शन सत्रात डॉ. दिनेश खेडकर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, नॅक आणि एनआयआरएफच्या निकषांच्या पूर्ततेसाठी 'करिअर कट्टा' उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. उमेश कणेरकर यांनी 'एआय आणि एमओयू' या विषयावर आधुनिक दृष्टिकोन मांडला. डॉ. धनंजय तळवणकर यांनी विविध अभ्यासक्रम, शिष्यवृत्ती आणि करिअर संधी यांबाबत माहिती दिली. प्रा. ममता पाडळकर यांनी विद्यार्थ्यांना कौशल्य विकासासाठी सातत्य विविध बाबींची भूमिका स्पष्ट केली.

## विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात विद्यार्थ्यांना निरोप



**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात केमिकल क्लबचा समारोप व भाग-२ च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ नुकताच संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यवस्थापन परीषदेचे सदस्य डॉ. संदीप वाघुळे, प्रमुख अतिथी म्हणून अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ. सुजाता काळे, अधिसभा सदस्य डॉ. जागृती बारब्दे, डॉ. जयंत वडतकर, केमिकल क्लब समन्वयक डॉ. मनिषा कोडापे, प्रा. ए. एस. वानखडे, प्रा. आर. डी. सातपुते उपस्थित होते. प्रास्ताविकातून डॉ. मनिषा कोडापे यांनी कार्यक्रमाविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन रेणुका काळे, तर आभार कोमल भालतडक हिने मानले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता श्रीराम सातव, कल्पना बैस, नरेंद्र व्यवहारे आदिंनी परिश्रम घेतले.

लोकमत

## विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात केमिकल क्लबचा समारोप व विद्यार्थ्यांना निरोप समारंभ

आम्हा प्रतिनिधी/२९ एप्रिल

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात केमिकल क्लबचा समारोप व भाग-२ च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्य.प. सदस्य डॉ. संदीप वाघुळे, प्रमुख अतिथी म्हणून अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ. सुजाता काळे, अधिसभा सदस्य डॉ. जागृती बारब्दे, डॉ. जयंत वडतकर, केमिकल क्लब समन्वयक डॉ. मनिषा कोडापे, प्रा.ए.एस. वानखडे, प्रा. आर.डी. सातपुते उपस्थित होते.

डॉ. सुजाता काळे मार्गदर्शन करतांना म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण मेहनत व सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपल्या ध्येयाकडे वाटचाल करावी. तर अध्यक्षीय भाषणातून डॉ. संदीप वाघुळे यांनी परीक्षा, संशोधन, उद्योग क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्रातील स्पर्धांची माहिती देत विद्यार्थ्यांनी वेळेचे योग्य व्यवस्थापन, शिस्त, प्रामाणिकपणा आणि चिकाटीच्या जोरावर यश संपादन करीत आपल्या



विद्यापीठाचा नावलौकीक करावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने रांगोळी स्पर्धा, कविता, शायरी, सजावट, क्रिकेट अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले, त्यामध्ये विद्यार्थ्यांनी हिरीरीने भाग घेतला. स्पर्धेत विजेता ठरलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व स्मृतिचिन्ह देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर विभागाचे नांव उज्वल करणा-या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सुध्दा आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकातून डॉ. मनिषा कोडापे यांनी कार्यक्रमाविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन कु. रेणुका काळे, तर आभार कु. कोमल भालतडक हिने मानले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता श्रीराम सातव, कल्पना बैस, नरेंद्र व्यवहारे आदिंनी परिश्रम घेतले.

**हिंदुस्थान**

# अमरावती विद्यापीठाच्या संघाने रचला इतिहास

## अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत प्रथम पारितोषिक




अमरावती दि. २ : ऑल इंडिया युनिव्हर्सिटीज्दारा आयोजित मौलाना आजाद नॅशनल उर्दू विद्यापीठ, हैद्राबाद येथे ०१ ते ०२ एप्रिल, २०२६ दरम्यान झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत कला क्षेत्रातील अतिशय प्रतिष्ठीत प्रथम पुरस्कार संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांच्या संघाने दिमागदार कामगिरीने प्राप्त करून इतिहास रचला आहे. या यशाबद्दल चमूंचे सर्वत्र कौतुक होत आहे.

विद्यापीठ चमूंमध्ये ओम कराळे, अजय हागे, गजानन पळसकर, कु. कल्याणी सावके, कु. आचल सरदार, कु. शर्वरी देशमुख, कु. ईश्वरी इंगळे, कु. गौरी लड्ढा, कु.साक्षी वानखडे, कु. गौरी मलथानकर, तर साथीदार म्हणून तबला वादक श्री हितेश व्यास, ढोलकी वादक श्री कार्तिक नंदवंशी व हार्मोनियम वादक श्री अमर कतोरे तसेच संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. अभिजित अणे व डॉ. राधिका देशमुख यांचा समावेश होता.

विद्यार्थी विकास विभागांतर्गत यावर्षी आयोजित आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव, आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य राज्य स्पर्धा, आंतर विद्यापीठ मध्य विभाग स्पर्धा, आंतर विद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सव तसेच आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली या सर्व स्पर्धेमध्ये मिळालेल्या अभूतपूर्व यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी संपूर्ण संघाचे अभिनंदन केले आहे.

**अमरावती इव्हिनिंग**

# अमरावती विद्यापीठाच्या संघाने रचला इतिहास

## अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत प्रथम पारितोषिक




अमरावती दि.०३ –ऑल इंडिया युनिव्हर्सिटीज्दारा आयोजित मौलाना आजाद नॅशनल उर्दू, विद्यापीठ, हैद्राबाद येथे ०१ ते ०२ एप्रिल, २०२६ दरम्यान झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत कला क्षेत्रातील अतिशय प्रतिष्ठीत प्रथम पुरस्कार संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांच्या संघाने दिमागदार कामगिरीने प्राप्त करून इतिहास रचला आहे. या यशाबद्दल चमूंचे सर्वत्र कौतुक होत आहे.

विद्यापीठ चमूंमध्ये ओम कराळे, अजय हागे, गजानन पळसकर, कु. कल्याणी सावके, कु. आचल सरदार, कु. शर्वरी देशमुख, कु. ईश्वरी इंगळे, कु. गौरी लड्ढा, कु.साक्षी वानखडे, कु. गौरी मलथानकर, तर साथीदार म्हणून तबला वादक श्री हितेश व्यास, ढोलकी वादक श्री कार्तिक नंदवंशी व हार्मोनियम वादक श्री अमर कतोरे तसेच संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. अभिजित अणे व डॉ. राधिका देशमुख यांचा समावेश होता.

विद्यार्थी विकास विभागांतर्गत यावर्षी आयोजित आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव,

# The Hitavada

## All India Inter-University National Qawwali Competition

# SGBAU team wins first prize, earns widespread appreciation

■ Amravati Bureau
AMRAVATI, Apr 3




The winning Qawwali team.

THE TEAM from Sant Gadge Baba Amravati University created history by winning the prestigious first prize in the All India Inter-University National Qawwali Competition, held at Maulana Azad National Urdu University, Hyderabad. Their remarkable performance has earned widespread appreciation.

The university team comprised the talented members including Om Karale, Ajay Hage, Gajanan Palskar, Kalyani Sawke, Achal Sardar, Sharvari Deshmukh, Ishwari Ingle, Gauri Laddha, Sakshi Wankhade and Gauri Malthankar. Supporting musicians included Hitesh Vyas (tabla), Kartik Nandvanshi (dholki) and Amar Katore (harmonium). The team was managed by Dr Abhijit Ane and Dr Radhika Deshmukh.

Under the Student Development Department, the university has also excelled in several other competitions this year, including the Inter-College Youth Festival, Inter-University Indradhanush State Competition, Inter-University Central Division Competition and the Inter-University National Youth Festival.

Dr Milind Barhate, Vice-Chancellor, Dr Mahendra Dhore, Pro-V-C, Dr Avinash Asnare, Registrar and Dr Rajiv Borkar, Director of Student Development congratulated the entire team.

# तरुण भारत

## अमरावती विद्यापीठ संघ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत प्रथम



विद्यापीठाची विजेती कव्वाली चमू

### हैदराबादेत पार पडली स्पर्धा

◆ अमरावती, ३ एप्रिल

ऑल इंडिया युनिव्हर्सिटीजद्वारा आयोजित मौलाना आझाद नॅशनल उर्दू विद्यापीठ, हैदराबाद येथे नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ-राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत कला क्षेत्रातील अतिशय प्रतिष्ठित प्रथम पुरस्कार संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संघाने प्राप्त करून इतिहास रचला आहे.

विद्यापीठ चमूत ओम कराळे, अजय हागे, गजानन पळसकर, कल्याणी सावके, आचल सरदार, शर्वरी देशमुख, ईश्वरी इंगळे, गौरी लड्डा, साक्षी वानखडे, गौरी मलथानकर, तर साथीदार म्हणून तबला वादक हितेश व्यास, ढोलकी वादक कार्तिक नंदवंशी व हार्मोनियम वादक अमर कतोरे तसेच संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. अभिजित अणे व डॉ. राधिका देशमुख यांचा समावेश होता.

विद्यार्थी विकास विभागांतर्गत यावर्षी आयोजित आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव, आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य राज्य स्पर्धा, आंतर विद्यापीठ मध्य विभाग स्पर्धा, आंतर विद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सव तसेच आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली या सर्व स्पर्धांमध्ये मिळालेल्या अभूतपूर्व यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी संपूर्ण संघाचे अभिनंदन केले आहे.

(तभा वृत्तसेवा)

# देशोन्नती

गुरुवार | दि. ३ एप्रिल २०२६

## अमरावती विद्यापीठाच्या संघाने रचला इतिहास




देशोन्नती वृत्तसंकलन

### अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत प्रथम पारितोषिक

अमरावती : ऑल इंडिया युनिव्हर्सिटीजद्वारा आयोजित मौलाना आझाद नॅशनल उर्दू विद्यापीठ, हैद्राबाद येथे ०१ ते ०२ एप्रिल, २०२६ दरम्यान झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत कला क्षेत्रातील अतिशय प्रतिष्ठित प्रथम पुरस्कार संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या संघाने दिमाखदार कामगिरीने प्राप्त करून इतिहास रचला आहे. या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

विद्यापीठ चमूमध्ये ओम कराळे, अजय हागे, गजानन पळसकर, कु. कल्याणी सावके, कु. आचल सरदार, कु. शर्वरी देशमुख, कु. ईश्वरी इंगळे, कु. गौरी लड्डा, कु. साक्षी वानखडे, कु. गौरी मलथानकर, तर साथीदार म्हणून तबला वादक श्री हितेश व्यास, ढोलकी वादक श्री कार्तिक नंदवंशी व हार्मोनियम वादक श्री अमर कतोरे तसेच संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. अभिजित अणे व डॉ. राधिका देशमुख यांचा समावेश होता.

विद्यार्थी विकास विभागांतर्गत यावर्षी आयोजित आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव, आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य राज्य स्पर्धा, आंतर विद्यापीठ मध्य विभाग स्पर्धा, आंतर विद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सव तसेच आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली या सर्व स्पर्धांमध्ये मिळालेल्या अभूतपूर्व यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी संपूर्ण संघाचे अभिनंदन केले आहे.



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## विद्यावार्ता ई - मासिक

### मार्गदर्शक



**श्री जिष्णू देव वर्मा**

मा. राज्यपाल तथा कुलपती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र-कुलगुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

### प्रकाशक



**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

### संपादक



**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ